# सृजन

जानेवारी – मार्च २०२२

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित



ऊर्जा रंगोत्सवासाठी






मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे (भा.प्र.से.) यांच्या हस्ते महानिर्मितीची वर्ष २०२२ ची दैनंदिनी व दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले, त्यावेळी उपस्थित संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (प्रकल्प) मा.श्री. व्ही. थंगपंडियन आणि अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी श्री. संजय कुऱ्हाडे उपस्थित होते.

## कोयना जल विद्युत केंद्र संकुल येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न







दि. २६ जानेवारी २०२२ रोजी कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे मुख्य अभियंता मा.श्री. संजय चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी उपस्थित अधिकारी-कर्मचारी यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले आणि उत्कृष्ट कामगिरी केलेल्या गुणवंत कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.




दि. २५ जानेवारी २०२२ रोजी राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून महानिर्मितीच्या सांघिक कार्यालयातील सभागृह येथे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) मा.श्री. आनंद कोंत ह्यांनी मानव संसाधन विभागातील उपस्थित अधिकारी-कर्मचारी व महिला कर्मचाऱ्यांना लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ दिली, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.



अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

## मनोगत

विजेसारख्या मुलभूत - पायाभुत क्षेत्राशी निगडीत असणाऱ्या महानिर्मितीने गेल्या सुमारे दोन वर्षांपासून आव्हानात्मक परिस्थितीला धैर्याने सामोरे जात ज्या पध्दतीने सातत्यपूर्ण वीजनिर्मिती साध्य केली आहे त्याला तोड नाही. गेल्या अनेक महिन्यांपासून जगभर भेडसावणारे अपुऱ्या कोळसा पुरवठ्याचे संकट, आर्थिक चणचण, प्राप्त कोळश्याच्या दर्जातील तफावतीमुळे नाहक निर्माण होणारे प्रदूषणाचे काही प्रश्न, विजेची वाढती मागणी या सर्व बाबींच्या पार्श्वभूमीवर देखील अखंड वीजनिर्मितीत महानिर्मिती कुठेही कधीही कमी पडलेली नाही. उन्हाळ्यात यापुढील २-३ महिनेही आपणां सर्वांना सामुहिक प्रयत्नांतून अशीच कामगिरी साध्य करावयाची आहे. इतकेच नव्हे तर हे सातत्य राखताना पावसाळ्यासाठीही कोळसा साठा किमान योग्य प्रमाणात करुन ठेवावयाचा आहे. सध्याचे हे सर्वात मोठे आव्हान समोर आहे.

नुकताच जागतिक महिला दिन संपन्न झाला आणि महानिर्मितीच्या मुख्यालयासहित क्षेत्रीय कार्यालयांमध्येही अनेक विधायक उपक्रम त्यानिमित्त संपन्न झाले. महानिर्मितीसारख्या अग्रेसर कंपनीत स्त्रीशक्तीने नेहमीच मोलाचे योगदान दिलेले आढळते. आपल्या कंपनीतील महिला अभियंता-कर्मचारी यांनी आपल्या परिश्रमाने प्रसंगी शिफ्टमध्ये कार्यरत राहून वीजनिर्मिती अखंड राखण्यात सहकार्य केलेले आहे. विशेषत: वीजकेंद्रांतील आव्हानात्मक व तांत्रिकी स्वरुपाच्या कामांची नित्य पूर्तता करणाऱ्या, शिफ्टमध्ये काम करणाऱ्या महिला अभियंता-कर्मचारी विशेष कौतुकास पात्र आहेत.

भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त महानिर्मितीने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी तसेच अन्य प्रकारच्या विविध निबंध, चित्रकला, लघुपट व पथनाट्य अशा खुल्या स्पर्धांचे आयोजन केले आहे. सर्वांनी त्यात सहभाग घेऊन हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करावेत. या स्पर्धांच्या माध्यमातून महानिर्मितीच्या प्रतिमासंवर्धनास हातभार लागावा आणि विशेषत: अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यार्थ्यांकडून वीज क्षेत्रातील नवनवीन संकल्पानांना चालना मिळावी यासाठी आपले प्रयत्न आहेत.

पर्यावरणसंवर्धनाविषयी महानिर्मितीने आजवर नेहमीच सर्वतोपरी प्रयत्न केलेले आहेतच. विशेषत: आपल्या औष्णिक वीजनिर्मिती प्रक्रियेचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होणार नाही यासाठी आपण दक्षता घेत असतोच. वने व पर्यावरणीय मंत्रालयाच्या निर्देशानुसार एफ.जी.डी. सारख्या यंत्रणा बसवून आपण अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अंगीकार करण्यासाठी सज्जदेखील झालेलो आहोत. परंतु, निश्चितच आणखी काही वर्षांनंतर औष्णिक वीजनिर्मितीच्या तुलनेत अपारंपारिक - सौर ऊर्जेचे प्राबल्य वाढणार असल्याचे सर्वांना माहीत आहेच. या दृष्टीनेही महानिर्मितीचे अनेक नवे सौर प्रकल्प या वर्षभरात कार्यान्वित होतील. आपल्या अपारंपारिक ऊर्जा क्षमतेत वाढ करण्याच्या या प्रयत्नांचा एक भाग म्हणजे काही दिवसांपूर्वी आपण महानिर्मितीच्या दोंडाईचा, जि. धुळे येथील २५० मेगावॅट क्षमतेच्या नव्या सौर प्रकल्पासाठी मे. टाटा पॉवर सौर्य लिमिटेड यांचेशी वीज खरेदी करार केला आहे. आपला आजवरचा हा सर्वात मोठा सौर प्रकल्प असणार आहे. या प्रकल्पामुळे महावितरण अपारंपारिक ऊर्जेचे अनिवार्य प्रमाण (RPO) राखण्यासही चांगली मदत होणार आहे. कारण प्रतिवर्षी या सौर प्रकल्पातून सुमारे ५.६७ दशलक्ष युनिट्स इतकी वीजनिर्मिती अपेक्षित आहे.

तसेच अनेक अडचणींवर मात करीत आपला ५० मेगावॅट क्षमतेचा कौडगांव सौर प्रकल्प देखील नुकताच कार्यान्वित झाला. या प्रकल्पासाठी काम करणारे अभियंते-कर्मचारी तसेच मे. भेलचे अभिनंदन. उर्वरित सौर प्रकल्प देखील नियोजनानुसार लवकरच पूर्ण होतील, ही अपेक्षा.

वीजक्षेत्रातील तंत्रज्ञानात दिवसागणिक होणाऱ्या गतिमान बदलांमुळे आपल्या समोर येणाऱ्या आव्हानांचे स्वरुपही बदलत आहे. या क्षेत्रातील स्पर्धात्मक वातावरणामुळे एकीकडे खाजगीकरणाची धास्ती कर्मचारी संघटनांना वाटत असली तरीही या अशा सर्व आव्हानांना सामोरे जाण्यास आपले प्रदीर्घ अनुभवसंपन्न असे वीज कामगार वा अभियंते नक्कीच सक्षम आहेत, याची मला खात्री आहे.

गुढीपाडवाच्या नववर्ष मुहूर्तावर मी आपणांस एक आनंदाची बातमी देऊ इच्छितो. गेल्या सुमारे दोन वर्षांच्या आव्हानात्मक काळात विपरीत परिस्थितीत महानिर्मितीने उत्कृष्ट विक्रमी कामगिरी सातत्याने नोंदवली. यासाठी महानिर्मितीच्या मनुष्यबळाचे सांघिक योगदान सुसूत्रीकरणात व्यवस्थापनाने मोलाची भूमिका बजावली. याची योग्य ती दखल घेत वर्ल्ड एच.आर. कॉंग्रेस या जागतिक संस्थेतर्फे मानव संसाधन क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कामगिरीबद्दल नुकतेच महानिर्मितीला "सी.ई.ओ. विथ एच.आर. ओरिएन्टेशन" व "लिडींग एच.आर. प्रॅक्टिसेस इन क्वॉलिटी वर्क" या दोन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. मला खात्री आहे की, महानिर्मितीच्या उन्नतीसाठी आजवर आपण सर्वांनी जी उत्तम साथ दिली आहे ती यापुढेही देत रहाल.

**- संजय खंदारे**

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात मा. ऊर्जा मंत्री मा.ना.डॉ. नितीन राऊत यांची आढावा बैठक संपन्न






पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दि. २८ फेब्रुवारी २०२२ रोजी मा. ऊर्जा मंत्री मा.ना.डॉ. नितीन राऊत यांनी आढावा बैठक घेतली. सदर बैठकीत पारस औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे, महावितरण अकोला परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. अनिल डोये व महापारेषण अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. बी.टी. राऊत यांच्याशी विविध समस्या जाणून घेऊन सुयोग्य मार्गदर्शन केले. याप्रसंगी तीनही वीजकंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी तसेच मेडा विद्युत निरीक्षक, जिल्हा माहिती अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.





## WELCOME Dr. Manvendra Ramteke joined as 'Director (H.R.)', MAHAGENCO



Dr. Manvendra Ramteke is an Alumni (MMS, Master Of Management Studies - Full Time) of the prestigious Management Institute; JBIMS (Jamnalal Bajaj Institute of Management Studies, Mumbai), with more than 24.5 years of experience in the Corporate World across multiple profiles, organizations and locations at middle/senior level. During his work career, he has worked on renowned National and International Brands across product categories and segments. He has also worked on well known Food/Bakery, Dairy and FMCG (Fast Moving Consumer Goods) related Brands and Companies with National and International repute. He is also pursuing LLB, currently in the final semester.

Exposure to Human Resource Management, PR & Communications, General Management & Accounts, Operations. Handled Divisions & Teams. Exposure to Sales, Marketing & Business Development. In-depth exposure to BTL activities for Brand building. Other key experience includes, Market Research, ATL, New Product Development, Pricing, POS, Social Media and Vendor Management.

An achiever in the Academic field, Dr. Manvendra has won numerous awards in School, College and Business School. The quest continued in the Corporate Sector where he has won internal awards at the Company level.

He was also a visiting faculty in leading Management Institutes of India, have judged lot of Events in Management Institutes and have also been an active part of various seminars in the Academic and Corporate Sector.

Responsibility towards the Society, City, State and the Country is important, it is essential to think from the heart, give soul to our thoughts, this philosophy has been the reason for him being associated with a lot of NGO's and other similar Organizations/Clubs and be a part of positive change. He has been bestowed with recognition for outstanding contribution in 2015-16, 2016-17 and 2017-18, 2019-20 and also received a prestigious Award for Best Club Service for 2016-17 and Award for Excellence in Vocational Avenue for 2019-2020.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

वर्ष १७ वे (अंक ४)

जानेवारी - मार्च २०२२

### संचालक मंडळ

| | |
|---|---|
| अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | : श्री. संजय खंदारे (भाप्रसे) |
| संचालक | : श्री. दिनेश वाघमारे (भाप्रसे) |
| संचालक (संचलन) | : श्री. चंद्रकांत थोटवे |
| संचालक (माईनिंग) | : श्री. पुरुषोत्तम जाधव |
| संचालक (प्रकल्प) | : श्री. व्ही. थंगपांडियन |
| संचालक (वित्त) | : श्री. बाळासाहेब थिटे |
| संचालक (मा.सं.) | : डॉ. मानवेंद्र रामटेके |
| संचालक | : श्रीमती. स्वाती व्यवहारे |

संपादक : **महेश आफळे**
जनसंपर्क अधिकारी (महानिर्मिती)

**मालकी**
**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या.**
प्रकाशगड, वांद्रे, मुंबई

**श्री. महेश गोविंद आफळे** यांनी
कार्यालय - **हेमा आर्टस्**
१२१, सागर, प्रभात इंडस्ट्रीयल इस्टेट,
दहिसर चेकनाक्याजवळ, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे,
दहिसर (पूर्व), मुंबई - ४०००६८ येथे छापून
प्रकाशगड, वांद्रे, मुंबई येथे प्रसिध्द केले.

**(खाजगी वितरणाकरिता)**

***The Company accepts no responsibility for the matter published in the Journal.***

# Maharashtra State Power Generation Company Limited

## JANUARY - MARCH 2022

## अनुक्रमणिका

| अनुक्रमणिका | लेखक / लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|
| या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे | संजय कुलकर्णी | ३ |
| बाहुलीचे लग्न | डॉ. अतुल बनसोड | ७ |
| जसं मन... तसं तन... | राजेश देशपांडे | ९ |
| सिनेमा आणि शहीद-ए-आजम | संतोष पुरोहित | १९ |
| Go for An EV... Right now... | Prashant Bhat | २२ |
| Utilization of Sugarcane Dry Pressmud as a Fuel at Thermal Power Plants (Part - I) | Sanjay Kurhade | २५ |

### काव्यकुंज

१३ ते १६

**सहभाग :-** राजेश व्हाडे, वैशाली धनविजय, धमेंद्र कन्नाके, सुर्यकांत वाघमारे राजेश पवार, सुनिता शांताराम पाटील, महेश आफळे, प्रवीण भोईर.

| | |
|---|---|
| **सेवानिवृत्ती / निरोप** | १८ |
| **महानिर्मितीचे कर्मयोगी / आपण यांना अंतरलो** | १८ |
| **प्रतिक्रिया** | १८ |

### प्रशासकीय वृत्त

**पृष्ठ क्र. : ४ ते १२, १७ ते २१, २४, २८**

संपादन सहाय्य : **संतोष पुरोहित**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
संपादक, सृजन
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,
दुसरा मजला, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : pro@mahagenco.in
संकेतस्थळ : www.mahagenco.in

# संपादकीय....

'सृजन' गृहपत्रिकेच्या या अंकात 'वाचक' म्हणून आपले स्वागत. होळी-रंगपंचमी हे आपल्या संस्कृतीतील पारंपारिक उत्सव. मानवी जीवनात विविध रंग भरुन ते आनंदमयी करण्यासाठी उर्जावान होण्याचे सामर्थ्य विजेच्या सुविधेमुळे मिळते. सर्वसामान्य जनजीवन सुसह्य होत असते ते केवळ विजेमुळेच. कोविडसारख्या वैश्विक आपत्तीत आपण याचा प्रत्यय दिला आहेच. त्यामुळे या क्षेत्रातील आपले अनन्यसाधारण स्थान लक्षात घेऊन भविष्यातील वीजक्षेत्र कसे असेल याकडे आपण गांभीर्याने बघणे हे आपल्या अस्तित्वासाठी आवश्यक असणार आहे. या अंकातील तांत्रिकी स्वरुपाचे लेख भविष्यातील वीजक्षेत्राची नेमकी चुणूक दाखवितात.

अंकातील मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे मनोगताचे माध्यमातून होणारे मार्गदर्शन हे नेहमीप्रमाणेच दिशादर्शक असून त्यादृष्टीने आपणां सर्वांना प्रेरित करणारे आहे. अन्य ललित लेख व स्फुटलेखनही वाचनीय आहेच. काव्य विभागात नवनवीन कवी आपले योगदान देत आहेत ही बाब समाधानाची असली तरीही मागील अंकात नमूद केल्याप्रमाणे 'सृजन' साठी क्षेत्रीय कार्यालयांकडून मिळणारा लेखन-प्रतिसाद दिवसांगणिक आकसताना दिसतो. 'सृजन गृहपत्रिका' हा गेल्या १७ वर्षांपासून सुरु असलेला 'अक्षरयज्ञ' सुरु ठेवायचा असेल तर सर्व वीजकेंद्रांनी - तेथील कर्मचाऱ्यांनी आपला सक्रिय सहयोग देणे आवश्यक आहे. अन्य गृहपत्रिकांच्या तुलनेत आपला 'सृजन' गृहपत्रिकेचा आकार प्रथमपासून अनेक पटींनी मोठा आहे आणि महानिर्मितीच्या एकूण वाटचालीचे समग्र प्रतिबिंब या दस्तऐवजरुपी गृहपत्रिकेतून उमटत असते. याची जाणीव ठेवून वीजकेंद्रातील महत्वाच्या उल्लेखनीय घडामोडींविषयी वृत्तांकन स्वयंस्फूर्तीने 'सृजन' कडे नियमित पाठविण्याची आवश्यकता आहे.

'सृजन' गृहपत्रिकेने आजवर इतकी वर्षे सातत्याने आपला दर्जा व नावलौकिक अबाधित ठेवला आहे याचे समाधान आहेच. तथापि, यावर्षी मी महानिर्मितीच्या सेवेतून स्वेच्छानिवृत्त होण्याचे नियोजन केलेले असल्याने माझ्या अपरोक्षही आपला 'सृजन' अंक असाच दिमाखदारपणे सुरु राहिला पाहिजे असे मनापासून वाटते. कारण आपणां सर्वांशी 'सृजन' चा संपादक या नात्याने मी सुध्दा गेल्या १७ वर्षांपासून या अक्षरात्मक ऋणानुबंधाने जोडला गेलेलो आहे.

आपणां सर्वांना होलिकोत्सव - रंगपंचमीनिमित्त रंगीत शुभेच्छा... !

**- महेश आफळे**

# या जन्मावर... या जगण्यावर... शतदा प्रेम करावे...

**- संजय कुलकर्णी,**
कार्यकारी अभियंता (मध्यवर्ती खरेदी विभाग) गट-२,
मुख्यालय, मुंबई



संध्याकाळी ऑफिसचे काम आटोपून लोकलने बांद्र्याहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला निघालो होतो. शुक्रवारचा दिवस आणि वीकएंड असल्याने पुढे अर्थातच अमरावती एक्सप्रेसने अकोला येथे प्रयाण करायचे होते. लोकल प्रवासात माहीमहून एक आंधळा भिकारी बऱ्यापैकी रिकाम्या असलेल्या आमच्या फर्स्ट क्लासच्या डब्यात चढला. हातात बासरी, फाटके पण नीटनेटके कपडे. अश्या व्यक्ती चटकन माझे लक्ष वेधून घेतात, कारण ही मंडळी जन्मत:च संगीताचे ज्ञान घेऊन आलेली असतात व यांनी छेडलेले सूर नकळत आपणास जीवनाचे तत्वज्ञान शिकवून जातात आणि झालेही तसेच. त्या व्यक्तीने मुकद्दर का सिकंदर या चित्रपटातील मोहम्मद रफी यांनी गायलेलं गीत वाजवण्यास सुरुवात केली.

**जिंदगी तो बेवफा है एकदिन ठुकरायेगी,**
**मौत मेहबुबा है अपने साथ ले कर जायेगी,**
**मर के जीने की अदा जो दुनिया को सिखलायेगा,**
**वो मुकद्दर का सिकंदर जानेमन कहलायेगा**

या गीताचा इंग्रजी तील स्वैर अनुवाद कदाचित असा असेल,

***" Life is unfaithful,***
***someday it will betray of you,***
***Death is your lover;***
***it will take you along.***
***While at the doorstep of death,***
***the one who to the world teaches the way to live...***
***will be called a Conqueror of destiny."***

हे गीत माझे लहान पणापासून खूप आवडते आहे, पण या व्यक्तीच्या सुरांनी मला नकळत या गीतावर विचार करण्यास भाग पाडले. हो आणि गीतही आहे तसेच, आयुष्यावर / या जीवनावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकास विचार करण्यास भाग पाडणारे.

आपण "या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे" या मंगेश पाडगावकरांच्या गीताचे नक्कीच चाहते असाल, मी पण आहे. खरंच आयुष्य खूप सुंदर आहे. आयुष्यात यश अपयश, सुख दु:ख हा ऊन सावलीचा खेळ सुरूच असतो सभोवतालचे सृष्टी सौंदर्य, आपली माणसं आपल्याला जगण्यातला आनंद देत असतात. रणरणत्या उन्हात क्षणभर मिळालेला गारवा ही आपली मरगळ, नैराश्य दूर करून नवीन उमेद व प्रेरणा देत असतो, आशा पल्लवित करत असतो. सतत येणाऱ्या अपयशाने न खचता याच अपयशातून प्रेरणा घेत प्रयत्न सुरु ठेवल्यास शेवटी यशाचा गोडवा निश्चित चाखायला मिळतो. आयुष्यातील संघर्षानंतर मिळालेला हा गोडवा स्मृतीपटलावर कायम रेंगाळत राहून कटू स्मृती विसरण्यास भाग पाडतो. आणि हो म्हणतात ना, मानव जन्म इतक्या सहजासहजी मिळत नाही म्हणूनच मी सुद्धा नेहमी म्हणत असतो.

**या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे...**

पण लोकल प्रवासातील अंजान यांच्या या गीताने मला आज विचार करण्यास भाग पाडले. जिंदगी... जीवन... हे खरंच बेवफा आहे... कृतघ्न आहे... असावे... कारण एक दिवस हेच जीवन आपणास दूर करणार आहे, एकाकी सोडणार आहे, ठोकरणार आहे... आणि मृत्यू मात्र मेहबुबा, प्रियतमा आहे कारण या एकाकीपणात तीच / तोच साथ देणार आहे, आपणास सोबत नेणार आहे... अनंताच्या प्रवासाला...

हे गीत पुढे म्हणते की, मरणाच्या दारी असताना जो जगण्याची कला जगाला शिकवतो तोच खरा सिकंदर... भविष्याचा जेता... कारण मेल्यानंतर भूतकाळ ठरूनही तो भविष्यात त्याची ओळख कायम ठेवतो.

म्हणूनच आनंदात जगायचे तर या जगा दोन गीतांची सांगड घालून... वर्तमानात जगताना या जगण्यावर उदंड प्रेम करा आणि घ्या जगून झकासऽऽ आणि हो लक्षात ठेवा मृत्यूने तुम्हाला सोबत नेले तरी हे जग अजिबात थांबणार नाही आणि या जगाच्या लेखी तुम्ही भूतकाळात जाल...

कवी भा.रा. तांबे यांनी म्हटलेच आहे,

**सूर्य तळपतील चंद्र झळकतील ।**
**तारे आपुला क्रम आचरतील ।।**
**असेच वारे पुढे वाहतील ।**
**होईल काही का अंतराय ।।**

म्हणूनच असे जगा की, भविष्यावरही तुम्ही जगलेल्या आयुष्याची छाप राहील, तुमच्या स्मृती जिवंत राहतील... म्हणूनच गीतकार अंजान वरील गीतात म्हणतात,

**मर के जीने कि अदा जो दुनिया को सिखलायेगा**
**वो मुकद्दर का सिकंदर जानेमन कहलायेगा**

आणि मला ही म्हणावेसे वाटते की........

**काम करो ऐसा की पहचान बन जाये,**
**हर कदम ऐसा चलो की निशान बन जाये,**
**यहा जिंदगी तो सभी काट लेते है,**
**जिंदगी जिओ ऐसी की मिसाल बन जाये.**

क्या बात है,

पाडगावकरांच्या "या जन्मावर" या गीतामधील शेवटच्या कडव्यामधील ओळी, कोणासही न टळलेल्या या मृत्यूवर हसत हसत मात करण्याची शिकवण देऊन जातात आणि मौत रुपी मेहबुबापेक्षाही बेवफा जिंदगी किती श्रेष्ठ आहे हे सांगण्याचा प्रयत्न तर करत नाहीत ना? आणि हो मला वाटते की त्यासाठी मृत्यूची किंमत मोजायची तयारी ठेव असेही सांगतात... काय आहेत त्या ओळी,

**या ओठानी चुंबुन घेईन हजारदा ही माती**
**अनंत मरणे झेलून घ्यावी इथल्या जगण्यासाठी**

माझ्या भाषेत म्हणाल तर **"ऐसी अनगिनत मौत कुर्बान है इस हसीं जिंदगी पर"**

जीवन अशाश्वत आहे तर मृत्यू अटळ. पण त्या अटळ मृत्यूच्या भयाने जीवनातील आनंद का गमवायचा? तर मुळीच नाही, जीवन आणिं मृत्यू, दोघांना योग्य न्याय द्यायचा.

गीतकार इंदीवर यांनी म्हटलेच आहे,

**जिंदगी का सफर ये है कैसा सफर,**
**कोई समजा नही, कोई जाना नही,**
**जिंदगी से प्यार हमने बहोत किया,**
**मौत से भी मोहब्बत निभायेंगे हम**

क्योकी मौत का दुसरा नाम मेहबुबा है...

******

प्रशासकीय वृत्त

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात ७३ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न

परळी औ.वि. केंद्र येथे प्रजासत्ताक दिन (२६ जानेवारी) कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेची खबरदारी बाळगत शासनाच्या नियमांचे पालन करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांनी उद्देशिकेचे वाचन केले. त्या पाठोपाठ सर्वांनी उद्देशिकेचे वाचन केले. यानंतर मुख्य अभियंता मा.श्री. आव्हाड यांचे हस्ते सकाळी ध्वजारोहण करण्यात आले. त्याचप्रमाणे प्रशासकीय इमारतीसमोर उद्यानाला पुर्नजिवीत करून माँ जिजाऊ उद्यान असे नामांकरण करण्यात आले.

सदर कार्यक्रमास सर्व उप मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंते, सर्व अधिकारी, अभियंते, कर्मचारी, संघटना प्रतिनिधी, कंत्राटदार व कंत्राटी कामगार उपस्थित होते.

प्रशासकीय वृत्त

## महानिर्मितीचे संचालक (मा.सं.) मा.डॉ. मानवेंद्र रामटेके यांचा विशेष गुणसंवर्धन कार्यशाळेचा उपक्रम

महानिर्मितीमध्ये नुकतेच रुजू झालेले संचालक (मानव संसाधन) डॉ. मानवेंद्र रामटेके यांनी एक अतिशय अभिनव स्तुत्य उपक्रम सुरु केला आहे. महानिर्मितीच्या अधिकाऱ्यांच्या गुणसंवर्धनासाठी म्हणजे मानव संसाधनाच्या विकासासाठी त्यांनी विशेष गुणसंवर्धन कार्यशाळेची एक मालिका सुरु केली आहे. त्या मालिकेतील पहिले सत्र दि. १५ फेब्रुवारी २०२२ रोजी कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. सत्राचा विषय नेतृत्व व संघ व्यवस्थापन (Leadership & Team Management) असा होता. डॉ. रामटेके यांनी अतिशय समर्पकपणे विषयाची मांडणी केली . नेतृत्व करताना कुठल्या गुणांची आवश्यकता असते, त्यातल्या कोणत्या गुणांचे विशेष संवर्धन केले पाहिजे याविषयी चर्चा करताना अतिशय समर्पक उदाहरणे देऊन तो विषय सोपा करुन सांगितला. त्यानंतर नेत्यांची कार्यपध्दती कशी असावी याचे विवेचन करतांना त्यांनी श्रोत्यांनाही त्यात सहभागी करुन घेऊन विषयाचे विस्तृत विवेचन केले. नंतर वेळेचे नियोजन कसे करावे यासंबंधी मार्गदर्शन करताना त्यांनी चतु:सुत्रीचा अवलंब करुन कामाच्या वेळेचे नियोजन कसे करावे यासंबंधी सांगितले. कार्यक्रमाला महानिर्मितीचे उच्च अधिकारी (अभियंते, मानव संसाधन अधिकारी व वित्त व लेखा अधिकारी) उपस्थित होते. कार्यक्रमाच्या एकंदरीत आयोजनाबद्दल अतिशय समाधान व्यक्त करुन श्री. प्रकाश खंडारे, मुख्य अभियंता (सं व सु.), औ.वि. केंद्र, ६६० मेगावॅट कोराडी व श्री. राजकुमार तासकर, मुख्य अभियंता (प्रशिक्षण) कोराडी प्रशिक्षण केंद्र यांनी डॉ. रामटेके यांना मन:पूर्वक धन्यवाद दिले.

याच मालिकेतील दुसरी कार्यशाळा दि. १६ फेब्रुवारी २०२२ रोजी कोराडी प्रशिक्षण केंद्राच्या सभागृहात खापरखेडा औ.वि.केंद्र येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आली. याप्रसंगी खापरखेडा औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता श्री. राजू घुगे व त्यांची चमू उपस्थित होते. याप्रसंगी श्री. घुगे यांनी मनोगत व्यक्त करताना कार्यशाळेत सांगितलेल्या सुचनांचा उपयोग करुन नेतृत्व अधिक प्रगल्भ करण्याचा प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

याच मालिकेतील तिसरे सत्र दि. १८ फेब्रुवारी २०२२ रोजी कोराडी प्रशिक्षण केंद्र येथे आयोजित करण्यात आले. या कार्यशाळेत कोराडी प्रकल्प, निर्मिती बांधकाम, कोळसा विभाग व कोराडी स्थापत्य या विभागातील अधिकारी / अभियंते उपस्थित होता. या अभिनव उपक्रमाचे सर्वांनी भरभरुन कौतुक केले. ही मालिका यापुढेही नवीन विषयांसह सुरु राहील असे संचालक (मानव संसाधन) डॉ. मानवेंद्र रामटेके यांनी सांगितले व सर्वांनी आपापल्या आवडीचे विषय सुचविण्यास सांगितले, ज्यांचा अंतर्भाव पुढील सत्रात करता येईल.

# पुरेसा कोळसा साठा नसूनही महानिर्मितीकडून सातत्याने अखंड वीजनिर्मिती साध्य

महानिर्मिती ही मे. एन.टी.पी.सी. पाठोपाठ स्थापित क्षमतानिहाय देशात दुसऱ्या क्रमांकाची वीजनिर्मिती कंपनी असून महानिर्मितीच्या विद्युत केंद्रांची एकूण स्थापित क्षमता १२,९७२ मेगावॅट इतकी आहे. त्यापैकी औष्णिक विद्युत क्षमता ९,५४० मेगावॅट इतकी असून गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने महानिर्मितीतर्फे प्रतिदिन सुमारे ६,५००–७,००० मेगावॅट इतकी वीजनिर्मिती साध्य करून महावितरणला पुरविण्यात येत आहे.

सरासरी सुमारे ७०% भारांक राखण्यासाठी महानिर्मितीच्या सर्व औष्णिक संचांसाठी मिळून प्रतिदिन रेल्वेमार्गे सरासरी २२ रेक्सद्वारे व रस्ता वाहतुक – रोप–वेद्वारे एकूण सुमारे १,०५,००० मेट्रिक टन इतक्या प्रमाणात कोळशाची आवश्यकता असते. महानिर्मितीला यापैकी सुमारे ६०% कोळसा मुख्यत्वे मे. वेस्टर्न कोलफिल्ड्स लि. यांचेकडून तर उर्वरित कोळसा मे. एस.ई.सी.एल., मे. सिंगरानी कोल कॉलिअरीज लि. व मे. महानदी कोलफिल्ड लि. या कोळसा कंपन्यांकडून प्राप्त होत असतो.

सद्य:स्थितीत कोराडी व खापरखेडा ही दोन औष्णिक वीजनिर्मिती केंद्रे वगळता चंद्रपूर, पारस, परळी, नाशिक व भुसावळ या औष्णिक वीजनिर्मिती केंद्रांत पुरेसा कोळसा साठा नाही, ही वस्तुस्थिती आहे. केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA) च्या संकेतस्थळावरील आकडेवारीवरून महानिर्मितीच्या सातही औष्णिक विद्युत केंद्रातील कोळसा साठा संवेदनशील प्रमाणात आहे, हे स्पष्ट होते. महानिर्मिती सोबतच राज्यातील अन्य काही खाजगी वीजउत्पादकांकडे देखील कोळश्याचा पुरेसा साठा नाही, हे या संकेतस्थळावरील तक्त्यात नमूद आहे. तथापि, गेल्या सुमारे ३–४ महिन्यांपासून कोळसा साठ्याची स्थिती साधारणत: याच स्वरूपाची असूनही महानिर्मितीने प्रभावी इंधन व्यवस्थापनाच्या माध्यमातून सातत्यपूर्ण वीजनिर्मिती साध्य केली आहे. राज्याची विजेची गरज भागविण्यात महानिर्मितीने नेहमीच लक्षणीय योगदान दिलेले आहे.

गतवर्षी दि. १ ऑगस्ट २०२१ रोजी महानिर्मितीकडे १४.११ लक्ष टन इतका कोळसा साठा होता व तो सरासरी साधारण १५ दिवस पुरेल इतका असल्याने साठ्याची स्थिती समाधानकारक होती. परंतु, कोविड–१९ आपत्तीमुळे वेळोवेळी लॉकडाऊन परिस्थितीत उद्योगधंदे बंद असल्याने विजेची मागणी त्या प्रमाणात तुलनेने कमी झालेली होती. तसेच एकूणच कोविड–१९ आपत्तीमुळे ही मागणी कधी व किती प्रमाणात वाढेल याबाबत अनिश्चित परिस्थिती असल्याने कोळसा साठा किती प्रमाणात करावा यासंबंधी निर्णय घेणे अवघड झाले होते. कोळसा साठा करत असताना वीजकेंद्रातील उपलब्ध जागा व कोळसा खरेदीपोटी कोळसा कंपन्यांना द्यावी लागणारी मोठी रक्कम लक्षात घेता एका मर्यादेपलीकडे कोळसा साठा करणे शक्य नव्हते, ही वस्तुस्थिती आहे. आधीच वीज बिलांच्या वसुलीतीत महसुली तुटीमुळे महावितरण आर्थिकदृष्ट्या अडचणीत असताना महानिर्मितीला देखील आर्थिक झळ पोहोचलेली आहे.

तद्‌नंतर पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे कोळसा खाणींमधून कोळसा उत्पादन बाधित झाल्याने तसेच कोळसा वहनाच्या देखील समस्या उद्भवल्याने त्या काळात महानिर्मितीला प्रत्यक्षात रेल्वेद्वारे साधारण प्रतिदिन १५ रेक्स तसेच रस्ता वाहतुक – रोप–वेद्वारे एकूण साधारण ७०,००० मेट्रिक टन इतक्याच प्रमाणात कोळसा प्राप्त झाला. त्यामुळे कोळसा साठ्यावर विपरीत परिणाम होऊन कोळसा साठा त्या प्रमाणात कमी झाला. अर्थात तत्कालीन परिस्थितीत साधारण ऑक्टोबर–नोव्हेंबर महिन्यांत केवळ महानिर्मितीलाच नव्हे तर मे. एन.टी.पी.सी. सह अन्य राज्यातील वीजनिर्मिती कंपन्यांच्या वीजनिर्मितीवर देखील पुरेश्या कोळसा पुरवठ्याअभावी परिणाम होऊन देशभर वीजटंचाईचे संकट निर्माण झाले होते. अशा परिस्थितीत महानिर्मितीने कोळसा पुरवठा पूर्ववत होण्यासाठी सर्वच स्तरावर सर्वतोपरी प्रयत्न केले.

तत्कालीन परिस्थितीत मा. ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र शासन हे सातत्याने केंद्रीय कोळसा मंत्री, केंद्रीय ऊर्जा मंत्री यांचेशी संपर्कात होते. कोळसा टंचाईची समस्या दूर करण्यासाठी कोळसा मंत्रालय, ऊर्जा मंत्रालय व रेल्वे मंत्रालय यांचेमध्ये दैनंदिन तत्वावर वरिष्ठ – सचिव पातळीवर व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारा संवाद होऊन परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी उपाययोजना केल्या गेल्या. महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनीदेखील केंद्रातील कोळसा मंत्रालयाशी प्रत्यक्ष भेटीद्वारे संपर्क साधून राज्यातील कोळसा टंचाई समस्येचे गांभीर्य संबंधितांच्या निदर्शनास आणून दिलेले होते. महानिर्मितीच्या कोळसा व्यवस्थापन चमूने आंतर मंत्रालयीन गटाशी वेळोवेळी बैठकीच्या माध्यमातून कोळसा उपलब्धतेबाबत विविध उपाययोजना केल्या. त्याचप्रमाणे सध्या देखील महानिर्मितीचे वरिष्ठ अधिकारी व अन्य कर्मचारी संबंधित कोळसा खाण परिसरात उपस्थित राहून जास्तीत जास्त कोळसा प्राप्त व्हावा यासाठी प्रयत्नशील असतात.

या सर्व एकत्रित प्रयत्नांचा परिणाम म्हणून कोळसा पुरवठ्यात टप्प्याटप्प्याने सुधारणा होत गेली. साधारणत: गेल्या दिवाळीपासून उद्योगधंद्यांचे अर्थचक्र गतिमान झाल्याने विजेची मागणी सातत्याने वाढती असून अन्य वर्षांच्या तुलनेत यंदाच्या हिवाळ्यातील विजेची मागणी देखील जास्त असल्याने कोळशाची आवक बरी असूनही वाढीव वीजनिर्मितीमुळे जास्त प्रमाणात कोळसा लागल्याने त्याच्या साठ्यात लक्षणीय सुधारणा होण्यास मर्यादा आल्या. तसेच महावितरणकडून थकित येणे रक्कम पुरेश्या प्रमाणात प्राप्त होण्यास मर्यादा असल्याने परिणामस्वरूप कोळसा कंपन्यांची देणी भागविणे दुरापास्त झालेले आहे. तरीदेखील, सद्य:स्थितीत महानिर्मितीने कर्जाच्या माध्यमातून कोळसा कंपन्यांना देय असलेल्या थकित देयकांचेही २००० कोटी रुपयांची देयके अदा केलेली असून उर्वरित रक्कमही लवकरात लवकर देण्यासाठी महानिर्मिती प्रयत्नशील आहे.

महानिर्मितीला सद्य:स्थितीत प्राप्त होणाऱ्या कोळश्याचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे :

## पुरेसा कोळसा साठा नसूनही महानिर्मितीकडून सातत्याने अखंड वीजनिर्मिती साध्य

| कोळसा पुरवठादार कंपनी | एप्रिल २०२१ ते जानेवारी २०२२ पर्यंत | | |
|---|---|---|---|
| | कोळशाची मागणी | प्राप्त कोळसा | कोळसा प्राप्त होण्याचे प्रमाण (%) |
| मे. वेस्टर्न कोलफिल्ड्स लि. | ३६,०३५ | २१,५०७ | ५९.६८ |
| मे. महानदी कोलफिल्ड लि. | ४,०६१ | २,३४८ | ५७.८२ |
| मे. साऊथ ईस्टर्न कोलफिल्ड्स लि. | ४,७७९ | ३,१०२ | ६४.९० |
| मे. सिंगरानी कोल कॉलिअरीज लि. | ५,३४७ | २,५५८ | ४७.८४ |
| **एकूण** | **५०,२२२** | **२९,५१५** | **५८.७७** |

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, अद्यापही महानिर्मितीला पुरेसा कोळसा प्राप्त होत नसून देखील प्रभावी इंधन व्यवस्थापनाच्या माध्यमातून महानिर्मितीने सातत्यपूर्ण वीजनिर्मिती लक्षणीय प्रमाणात साध्य केलेली आहे.

आता हिवाळा संपल्यामुळे तसेच लॉकडाऊनही शिथिल झाल्याने आगामी उन्हाळ्याच्या कालावधीत राज्याची विजेची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता आहे. अशावेळी त्या प्रमाणात वाढीव वीजनिर्मिती साध्य करण्यासाठी महानिर्मिती सर्वतोपरी प्रयत्न करत आहे.

महानिर्मिती रेल्वे वहनाव्यतिरिक्त रस्ते वाहतुक तसेच रोप–वे, कोळसा पाईप कन्व्हेअर बेल्टच्या माध्यमातून देखील मे. वेस्टर्न कोलफिल्ड्स लि., मे. महानदी कोलफिल्ड लि. आणि मे. साऊथ ईस्टर्न कोलफिल्ड्स लि. या कोळसा पुरवठादार कंपन्यांकडून प्राप्त होणाऱ्या कोळश्याचे वहन करत असून त्यामुळे अतिरिक्त कोळसा प्राप्त होत आहे. तसेच कोळशाचा उष्मांक वाढून त्यातील राखेचे प्रमाण कमी करण्यासाठी महानिर्मिती चंद्रपूर, कोराडी व खापरखेडा या औष्णिक वीजकेंद्रांसाठी काही प्रमाणात धुतलेल्या कोळश्याचा (Wash Coal) वापर करण्यात येत आहे. विविध कोळसा पुरवठादार कंपन्यांशी समन्वय साधून तसेच कोळसा खाणींमध्ये समन्वयासाठी व कोळश्याची प्रत–दर्जा यांवरील देखरेखीसाठी कर्मचारी नियुक्त करून कोळसा पुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी महानिर्मिती अथक प्रयत्नशील आहे. कोळसा अदलाबदलीचे धोरण (Coal Swapping) यशस्वीपणे राबवून कोळसा साठ्यात सुधारणा करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

## दोंडाईचा, जि. धुळे येथील २५० मेगावॅट सौर प्रकल्पासाठी महानिर्मितीतर्फे वीज खरेदी करार संपन्न

अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांच्या क्षमतेत वाढ करण्याच्या राज्याच्या महत्वाकांक्षी कार्यक्रमाअंतर्गत महानिर्मितीच्या दोंडाईचा, जि. धुळे येथील २५० मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पासाठीचा वीज खरेदी करार दि. १४ जानेवारी २०२२ रोजी महानिर्मिती व मे. टाटा पॉवर सौर्य लिमिटेड या दोहोंमध्ये मुख्यालय, मुंबई येथे संपन्न झाला. सदर करारांवर प्रकल्प विकासक या नात्याने महानिर्मितीचे वतीने श्री. सुनिल इंगळे, मुख्य अभियंता (सौर प्रकल्प) यांनी तर मे. टाटा पॉवर सौर्य लिमिटेडचे वतीने श्री. राकेश सिंह, चीफ बिझनेस डेव्हलपमेंट यांनी स्वाक्षरी केली. या प्रसंगी महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे, संचालक (प्रकल्प) श्री. व्ही. थांगपंडीयन, संचालक (संचलन) श्री. चंद्रकांत थोटवे, संचालक (माईनिंग) श्री. पुरुषोत्तम जाधव, संचालक (वित्त) श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (मानव संसाधन) डॉ. मानवेंद्र रामटेके, तसेच कार्यकारी संचालक (सौर, अपारंपारिक ऊर्जा (प्रकल्प) आणि सां.नि. व सु.) श्री. राजेश पाटील, आणि कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. भिमाशंकर मंता यांची तर मे. टाटा पॉवर सौर्य लिमिटेडचे अन्य वरिष्ठ अधिकारी यांची उपस्थिती होती.

महानिर्मितीतर्फे विकसित करण्यात येत असलेले सदर सौर पार्क हे सुमारे ५०४.७१ हेक्टर क्षेत्रफळाचे असून केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या योजनेअंतर्गत समाविष्ट आहे. तब्बल २५० मेगावॅट क्षमतेच्या या मोठ्या सौर प्रकल्पामुळे कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण न्यूनतम राखण्यात यश येणार असून महावितरणला अपारंपारिक ऊर्जेचे अनिवार्य प्रमाण (RPO) राखण्यास देखील मदत होणार आहे. या सौर प्रकल्पातून महानिर्मितीच्या माध्यमातून महावितरण रु. २.५८ प्रति युनिट इतक्या रास्त दरात वीज खरेदी करणार असल्याने वीजग्राहकांना दिलासा मिळणार आहे. या प्रकल्पातून प्रतिवर्षी सुमारे ५.६७ दशलक्ष युनिट्स एवढी वीजनिर्मिती अपेक्षित आहे.

या मोठ्या प्रकल्पामुळे दोंडाईचा परिसरातील स्थानिकांना प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष स्वरूपात रोजगार उपलब्ध होणार असून परिसराचा कायापालट होण्यास त्यायोगे मदत होणार आहे. साधारणत: एप्रिल २०२३ पर्यंत या प्रकल्प उभारणीचे काम पूर्णत्वास होणे अपेक्षित असून तद्नंतर किमान २५ वर्षे कालावधीसाठी हा प्रकल्प वीजनिर्मितीसाठी कार्यरत राहील. या सौर प्रकल्पातून उपलब्ध होणाऱ्या विजेचे तांत्रिकदृष्ट्या सक्षम पारेषण करण्यासाठी महानिर्मितीचे वतीने महापारेषणतर्फे २२०/३३ के.व्ही. क्षमतेचे उपकेंद्र परिसरात उभारण्यात येणार आहे.

महानिर्मितीतर्फे महाराष्ट्र हरित करण्याकरिता मोठे योगदान देण्यात येत आहे. या प्रकल्पाबरोबरच महानिर्मितीच्या माध्यमातून जास्तीत जास्त सौर ऊर्जा उत्पादन करण्यासाठी मा. ऊर्जा मंत्री डॉ. नितीन राऊत यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभत आहे. यामुळे आजपर्यंत २०७ मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प कार्यान्वित झालेले आहेत. भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांचे निर्देश आणि उद्दिष्टांच्या अनुषंगाने पुढील क्षमतावाढीसाठी महानिर्मितीमार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. आजमितीस एकूण २७९५ मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प अंमलबजावणीची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच महानिर्मितीमार्फत ग्रीन हायड्रोजन प्रकल्प उभारण्याकरिता अनुषंगिक कामे प्रगतीपथावर आहेत.

# बाहुलीचे लग्न

- डॉ. अतुल बनसोड,
अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
कोराडी औ.वि. केंद्र (३×६०० मेगावॅट)



आज सकाळी जरा निवांत बागेतल्या बाकावर बसला होतो, तेवढ्यात तिथे एक लहान मुलांची टोळी आली, अर्थात, बरोबर आधुनिक मदर होत्याच. आजकाल मुलांना एकटे कोण सोडतो, पटापट सगळ्यांनी आपल्या किट उघडल्या अन् सर्व बॅडमिंटन खेळू लागले. इकडे आया, जरा हातपाय हलवू लागल्या बरोबर चर्चेला विषय होता इव्हेंट मॅनेजमेंट. मी पण कान टवकारले अन् चर्चेचा आनंद घेऊ लागलो. लग्न प्रसंग हा त्या चर्चेचा विषय होता. खरंच, किती कठीण आहे नं... मॅनेज करायला वगैरे, स्वत: करणे कठीण, कॉन्ट्रॅक्ट देऊन मोकळे व्हा अन् निवांत रहा... इत्यादि बरोबर व्यायाम सुरु होताच.

मी मात्र अंतर्मुख झालो, खरंच, हे सर्व इतके कठीण आहे का? पूर्वी बहुतेक लग्नकार्य घरीच संपन्न होत असत. मित्र, नातेवाईक कार्याला हातभार लावून ते तडीस नेत असत, त्यामुळे यजमानास कुठलाही त्रास किंवा तणाव येत नव्हता. सर्व कसे व्यवस्थित पार पडत असे.

विचारांती माझ्या असे लक्षात आले की, या प्रसंगाचे प्रशिक्षण तर माझ्यासारख्या समवयस्क असलेल्याने अगदी लहानपणीच मिळाले आहे, तेही एका खेळातून! त्याकाळी बाहुलीचे लग्न हा खेळ बाळगोपाळ मंडळी उन्हाळी सुट्टीत खेळत असत, वर-वधु ऐवजी प्रतिकात्मक बाहुला आणि बाहुली, बाकी प्रसंग अगदी खराखुरा! कोणी मुलाचे आई-वडील, कोणी मुलीचे! सर्व नातेवाईक, आत्या, मामा, काका-काकू, नंदा-भावजया, प्रत्येकाला कामे वाटलेली, कोण काय करणार, आमंत्रण देणारे, भटजी, आचारी हे ठरलेले, कोण रुसणार, कोण गाल फुगवणार, याचा सुध्दा त्यात समावेश होता. खायचे जिन्नस बहुदा मोठ्यांनी करुन दिलेले, चिवडा, लाडू, चकल्या अन् इतर सटरफटर. प्रत्येकजण आपली जबाबदारी पार पाडणार.

एव्हाना या आयांचा व्यायाम आटोपला होता. मुलांना आवाज देत, उद्या दुसऱ्या पार्कमध्ये भेटू म्हणून त्यांनी निरोप घेतला. माझ्या अगदी तोंडावर आले होते की, यांना म्हणावे जरा लुटूपुटूच्या बाहुला-बाहुलीचे लग्न लावा म्हणजे तुम्ही अन् तुमची पोरं आपोआपच मॅनेजमेंटच्या दृष्टिकोनातून प्रशिक्षित व्हाल. मी स्वत:ला आवर घातला, अन् तिथून काढता पाय घेतला.

मी घराच्या दिशेने निघालो पण अंतरंगातून एका जुन्या बालगीताचे शब्द कानावर येत होते, ते गीत होते त्या काळाचे नामवंत बालगीत गायक, लेखक, संगीतकार शरद मुठे यांचे,

**माझ्या छुगडीच्या बाहुलीचे,**
**लगीन माझ्या छुगडीच्या**

आज मला या गीताचा वेगळाच नवीन अर्थ कळला, शब्द न् शब्द ओठांवर आले, बहुदा हेच इव्हेंट मॅनेजमेंटचे बाळकडू असावे.

******

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात संत सेवालाल महाराज यांची जयंती संपन्न

परळी औष्णिक विद्युत केंद्रात दिनांक १५ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस प्रभारी मुख्य अभियंता श्री. शाम राठोड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी-अभियंते, कर्मचारी तसेच संघटना प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रशासकीय वृत्त

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात संत रविदास महाराज यांची जयंती संपन्न

परळी औष्णिक विद्युत केंद्रात दिनांक २३ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस प्रभारी मुख्य अभियंता श्री. शाम राठोड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी-अभियंते, कर्मचारी तसेच संघटना प्रतिनिधी उपस्थित होते.

# कोयना जल विद्युत केंद्रात प्रजासत्ताक दिन संपन्न

कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे २६ जानेवारी २०२२ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनी मुख्य अभियंता श्री. संजय एस. चोपडे यांच्या हस्ते व सर्व अधिकारी /कर्मचारी यांच्या उपस्थितीत सकाळी ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ध्वजारोहण करण्यापूर्वी प्रथम मुख्य अभियंता मा.श्री. चोपडे यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिका पत्राचे वाचन केले, त्यापाठोपाठ उपस्थित सर्व अधिकारी / कर्मचारी, कंत्राटी कामगार यांनी उद्देशिका पत्राचे वाचन केले. यावेळी सर्वांनी सामाजिक अंतर ठेवून व मास्क परिधान करुन कोरोना (कोविड-१९) च्या नियमांचे पालन करीत,ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमप्रसंगी कोयना जल विद्युत केंद्रातील मागील वर्षी उत्कृष्ट कामगिरी पार पाडलेल्या कर्मचारी आणि विभागांचे मुख्य अभियंता मा.श्री. चोपडे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व भेटवस्तु देऊन गुणगौरव करण्यात आला. सर्वप्रथम प्रयत्न, धाडस, कष्ट व जबाबदारी या गुणांनी जिने आपण पुरुषांपेक्षा कुठेही कमी नाही हे दाखवून दिले, प्रसंगी विजेच्या खांबावर चढून काम करणारी आपल्या संकुलातील एकमेव महिला कर्मचारी कु. सोनाली द्रोपदा संपत चव्हाण, विद्युत परिक्षण वसाहत विभाग यांना मुख्य अभियंता मा.श्री. चोपडे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र आणि भेटवस्तू देण्यात येऊन सत्कार करण्यात आला. तसेच, मागील वर्षी पावसाळयात २१ व २२ जुलै २०२१ रोजी चिपळूण शहरामध्ये अतिवृष्टी झाली होती. तेव्हा चिपळूण शहरामध्ये आलेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये (महाप्रलय) कोयना जल विद्युत केंद्रामधील अग्निशमन विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांनी कोणतीही पर्वा न करता पावसामुळे आलेल्या पुराच्या पाण्यामध्ये उतरुन त्या ठिकाणी साठलेल्या कचऱ्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरलेली होती अशा सार्वजनिक ठिकाणी अग्निशमन वाहनासह परिसर स्वच्छ करुन शहरवासियांना केलेल्या मदतीबद्दल अग्निशमन विभागास मुख्य अभियंता यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.

त्यानंतर मुख्य अभियंता श्री. संजय एस. चोपडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणांमध्ये उपस्थित सर्वांना भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या व आपल्या देशातील ज्या ज्या थोर नेते व वीर सैनिकांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या लढ्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली त्यामुळेच आज आपण सर्व मुक्तीचा श्वास घेत आहोत असे सांगितले. त्याप्रमाणे, कोयना जल विद्युत केंद्रातील सर्व महिला अधिकारी / कर्मचारी या खूप अत्यंत चांगल्या पध्दतीने कार्यक्षेत्रात कार्य करीत आहेत असे सांगून विद्युत परिक्षण (वसाहत) विभागातील कार्यरत कु. सोनाली द्रोपदा संपत चव्हाण यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल कौतुक केले. तसेच मागील वर्षी चिपळूण शहरामध्ये पुरामध्ये अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांनी अत्यंत उत्कृष्ट अशी कामगिरी बजावली त्याबद्दलसुध्दा सर्वांचे कौतुक केले.

कार्यक्रमादरम्यान अधीक्षक अभियंता सर्वश्री. आर.के. कुंभार, आर.पी. रेड्डी, ए.डी. शिंदे, बी.जी. कोष्टी, सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. विजय देसाई, वरिष्ठ सुरक्षा व्यवस्थापक श्री. फडतरे, कल्याण अधिकारी श्री. प्रसाद निकम व इतर अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. त्यानंतर शिरगांव पोलिस स्टेशन येथील उपस्थित पोलिस कर्मचारी यांनी आणि कोयना जल विद्युत केंद्र, पोफळी येथील सुरक्षा विभागातील अधिकारी कर्मचारी व कंत्राटी सुरक्षा रक्षक आणि अग्निशमन विभागातील कर्मचारी यांनी परेड विर्सजन केले व भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहण कार्यक्रम कोरोना (कोविड -१९) च्या सर्व नियमांचे पालन करुन, अत्यंत साध्या पध्दतीने उत्साहात पार पाडला.

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांची जयंती संपन्न

नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील प्रशासकीय इमारत, एच.ओ.डी. हॉल येथे दि. २७ डिसेंबर २०२१ रोजी मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला.

मुख्य अभियंता मा.श्री. शिंदे यांनी पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन त्यांच्या जीवनकार्याबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना विशद करण्यात आली.

याप्रसंगी वरिष्ठ अभियंते, अधिकारी - कर्मचारी आणि महिला कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. निवृत्ती एस. कोंडावले यांनी केले.

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती संपन्न

नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील प्रशासकीय इमारत, एच.ओ.डी. हॉल येथे दि. १४ नोव्हेंबर २०२१ रोजी मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या १३२व्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला.

मुख्य अभियंता मा.श्री. शिंदे यांनी पंडित जवाहरलाल नेहरुन यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन त्यांच्या जीवनकार्याबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना विशद करण्यात आली.

याप्रसंगी वरिष्ठ अभियंते, अधिकारी - कर्मचारी आणि महिला कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. निवृत्ती एस. कोंडावले यांनी केले.

# जसं मन... तसं तन...

**– राजेश लक्ष्मण देशपांडे,**

पारस औ.वि. केंद्र



आपण बिमार झालो तर आधी बुध्दी निर्णय घेते, हे सिध्द झाले मग ते निगेटिव्ह विचार करते की, आपण खरंच बिमार झालो. आताचे ताजे उदाहरण बघा. कोरोना काळात श्वास कमी होणे, दम लागणे, ताप येणे, हात पाय दुखणे, साधा सर्दी ताप झाला तरी ऑक्सिजन लेव्हल कमी होते. छातीत धडधडायला लागते म्हणजेच कोरोनासदृश लक्षण हेच का? आपसुकच आपले लक्ष श्वास आणि ह्रदयाची धडधड मोजायला सुरुवात करते.

बरेच पेशंट ह्रदयरोग जसे बी.पी., शुगर, दरम्यान ग्रासले आहेत. काही लोक टी.बी. ने ग्रासले. त्यांना श्वास काय माहीत नाही. ते सुध्दा आपल्याला श्वास लागतो, दम लागतो बोलायला लागले आणि दवाखान्यात झुंबड उडाली, मानसिकदृष्ट्या आपण आजारी झालो. हे सिध्द झाले जसा आपण विचार करतो तसे संकेत बुध्दी आपल्याला देते आणि आपण निगेटिव्ह विचार करुन मानसिकदृष्ट्या आजारी होतो. आजपर्यंत कोणालाही ऑक्सिजन लेव्हल काय, धडधड काय कुणालाच माहीत नव्हतं.

म्हणून माझं एकच सांगणे आहे की, जास्तीत जास्त या विषयाकडे लक्ष न देता आपली कामे सुरळीत चालू ठेवा. वेळोवेळी डॉक्टरचा सल्ला घ्यावा, परंतु मानसिक आजार होऊ नका. जसं मन बुध्दी विचार करेल तसे आपण आजारी पडू यात शंका नाही.

******

प्रशासकीय वृत्त

## माननीय ऊर्जा मंत्री मा.डॉ. नितीन राऊत ह्यांची पारस औष्णिक विद्युत केंद्रास भेट

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दि. २८ फेब्रुवारी २०२२ रोजी माननीय ऊर्जा मंत्री मा.ना.डॉ. नितीन राऊत यांनी आढावा बैठक घेतली. सदर बैठकीत पारस औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे, महावितरण अकोला परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. अनिल डोये व महापारेषण अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. बी.टी. राऊत यांच्याशी विविध समस्या जाणून घेऊन सुयोग्य मार्गदर्शन केले.

याप्रसंगी तीनही वीजकंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी तसेच मेडाचे विद्युत निरीक्षक व जिल्हा माहिती अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात संत रविदास महाराज व संत गाडगेबाबा यांची जयंती संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दि. २३ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली संत रविदास महाराज व संत गाडगेबाबा महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

मुख्य अभियंता मा.श्री. खटारे ह्यांनी संत रविदास महाराज व संत गाडगेबाबा महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन दीपप्रज्वलन केले आणि संत रविदास महाराज आणि संत गाडगेबाबा महाराज यांच्या जीवनकार्याबद्दलची माहिती विषद करण्यात आली.

या प्रसंगी उप मुख्य अभियंता श्री. आर.बी. गिरी, अधीक्षक अभियंते सर्वश्री. धनंजय पंधाडे, संजय कांबळे, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गट्टूवार आणि अन्य अधिकारी–कर्मचारीवृंद उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. मयुर मेंढेकर यांनी केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात छत्रपती शिवाजीमहाराज यांची जयंती संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दि. १९ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

मुख्य अभियंता मा.श्री. खटारे ह्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन दीपप्रज्वलन केले आणि त्यांच्या जीवनकार्याबद्दलची माहिती विषद करण्यात आली.

या प्रसंगी उप मुख्य अभियंता श्री. आर.बी. गिरी, अधीक्षक अभियंते सर्वश्री. धनंजय पंधाडे, संजय कांबळे, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गट्टूवार आणि अन्य अधिकारी–कर्मचारीवृंद उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. मयुर मेंढेकर यांनी केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात संत सेवालाल महाराज यांची जयंती संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे दिनांक १५ फेब्रुवारी २०२२ रोजी संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमात सुरुवातीस संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करून संत सेवालाल महाराज यांच्या जीवन कार्याबद्दलची माहिती विषद करण्यात आली.

या कार्यक्रमाचा प्रसंगी अध्यक्षस्थानी मा. मुख्य अभियंता श्री विठ्ठल शि. खटारे, प्रमुख उपस्थिती म्हणून उपमुख्य अभियंता श्री. आर.बी. गिरी, अधीक्षक अभियंते श्री. धनंजय पंधाडे, श्री. संजय कांबळे व प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गट्टूवार व इतर अधिकारी /कर्मचारी वृंद उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. मयुर मेंढेकर यांनी केले.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती संपन्न

परळी औष्णिक विद्युत केंद्र येथील प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण अर्पण केले. या कार्यक्रमाप्रसंगी सर्वश्री उपमुख्य अभियंता श्री. अवचार, राठोड अन्य अधिकारी व कर्मचारी आणि महिला कर्मचारी उपस्थित होते.

## कोयना जल विद्युत केंद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती संपन्न

कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथे दि. १९ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता सहयाद्री प्रशासकीय इमारत सभागृहामध्ये श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस श्री.संजय एस. चोपडे, मुख्य अभियंता, यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी या जयंती कार्यक्रमास अधीक्षक अभियंता (प्रशासन) श्री. आर.के. कुंभार, अधीक्षक अभियंता (टप्पा क्र ३) श्री. ब्रम्हानंद कोष्टी, कार्यकारी अभियंता श्री. संजय एस. रिठे, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. एन.के. फडतरे व कल्याण अधिकारी श्री. प्रसाद निकम, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. डी.व्ही. पाटील, उप वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. एस.बी. शिर्के आणि कार्यालयातील पुरुष व महिला अधिकारी / कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती संपन्न

दि. २७ डिसेंबर २०२१ रोजी पारस औष्णिक विद्युत केंद्रात डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी मुख्य अभियंता मा. श्री. आर.बी. गिरी हे उपस्थित होते. त्याचबरोबर प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. राजेश गट्टूवार, अधीक्षक अभियंते श्री. बी.एम. पंधाडे, श्री.एस.एस.कांबळे उपस्थित होते.

सर्वप्रथम कार्यक्रमाच्या सुरुवातील डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला दिपप्रज्वलन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. तद्नंतर डॉ. पंजाबराव देशमुख यांच्याविषयी माहिती विषद करण्यात आली.

या प्रसंगी श्री. ए.आर.मोहोड, श्री. व्ही.एस. अर्बट, आणि अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन तंत्रज्ञ-३ सौ. विजया लहाने यांनी केले.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती संपन्न

पारस औष्णिक विद्युत केंद्रात दि. ३ जानेवारी २०२२ रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमात मुख्य अभियंता मा.श्री.विठ्ठल खटारे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रभारी उपमुख्य अभियंता श्री. आर.बी. गिरी, श्री. डी.एम. पंधाडे अधीक्षक अभियंता, श्री. राजेश गट्टूवार प्रभारी अधीक्षक अभियंता, श्री. एस.एस. कांबळे अधीक्षक अभियंता, श्री. पी.एम. गेडाम, श्री. अविनाश राठोड, श्री. निलय महाजन, श्री. गोपाल चोपडे, श्री. सावळे, सौ. सुनंदा बेहेरे, सौ. वर्षा चिलवंत सौ. विजया लहाने, श्री. मयुर मेंढेकर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

## कोयना जल विद्युत केंद्रात संत सेवालाल महाराज यांची जयंती संपन्न

कोयना जल विद्युत केंद्र पोफळी येथे दिनांक १५ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी सह्याद्री प्रशासकीय इमारत सभागृहामध्ये संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस श्री. आर.के. कुंभार, मुख्य अभियंता (प्रभारी) यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी जयंती कार्यक्रमास श्री. राजीव रेडडी, अधिक्षक अभियंता (टप्पा क्र. १ व २) श्री. एन.के. फडतरे, वरिष्ठ सुरक्षा अधिकारी व श्री. प्रसाद निकम, कल्याण अधिकारी, श्री. डी.व्ही. पाटील, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रीमती. माधुरी पवार, व्यवस्थापक (मा.सं.) आणि कार्यालयातील पुरुष व महिला अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. सौ. स्नेहल नकाते, अतिरिक्त कार्यकारी अभियंता (तांत्रिक विभाग) यांनी या जयंती कार्यक्रमावेळी संत सेवालाल महाराज यांच्या जीवन कार्याबाबतची सविस्तर माहिती वाचून दाखविली.

## उरण वायु विद्युत केंद्राचा ४० वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

दिनांक २० फेब्रुवारी २०२२ रोजी उरण वायु विदुयत केंद्राचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. वर्धापन दिनाच्या निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, त्यात प्रामुख्याने क्रिकेट, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, कॅरम, मॅरेथॉन, बॉक्स क्रिकेट या मैदानी खेळांसोबत वसाहतीमधील इमारत परिसर स्वच्छता स्पर्धा हा अभिनव उपक्रम देखील राबविण्यात आला.

विविध शालेय गटातील विद्यार्थ्यांसाठी स्वच्छता व पर्यावरण या विषयावर भित्तीपत्रक स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये वसाहतीमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वसाहतीमधील महिलांनी विविध स्पर्धांमध्ये आपला सहभाग नोंदवून आपल्या विविध खेळातील कौशल्य प्रदर्शित केले. सुबक रांगोळी स्पर्धेने वर्धापन दिनाच्या उत्साहात रंगत आणली. भारतरत्न लता मंगेशकर यांच्या अजरामर गीतांचा सदाबहार कार्यक्रम आयोजित करून लता मंगेशकर यांच्या सुरेल स्मृतींना उजाळा देण्यात आला, त्यास वसाहतवासियांनी भरभरून प्रतिसाद दिला.

दिनांक १९ फेब्रवारी २०२२ रोजी महाराष्ट्राचे आराध्य दैवत शिवछत्रपती यांच्या जयंतीनिमित्त भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. त्यात वसाहतवासियांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून सर्व वसाहत परिसर चैतन्यमय केला. आनंदमेळावा हे या वर्धापन दिनाचे विशेष आकर्षण होते. विविध रुचकर खाद्यपदार्थांच्या स्टॉलवर हजेरी लावत वसाहतवासियांनी यथेच्छ आस्वाद घेतला आणि त्यामध्ये हौजी खेळाने तर वेगळीच उत्सुकता भरली.

संचलन विभागाने आयोजनाची जबाबदारी स्वीकारलेल्या या वर्धापन दिनानिमित्त दिनांक २० फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी मुख्य अभियंता मा.श्री. गिरीश कुमरवार, अधीक्षक अभियंता श्री. सुनील वाघ व श्री. प्रसन्नकुमार गरुड तसेच आयोजन समिती सचिव - कार्यकारी अभियंता श्री कामटे यांचे हस्ते वीजगृहात पूजा करून विविध विभागांना भेट देऊन वीज गृहात कार्यरत अभियंता, अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार व कंत्राटी कर्मचारी यांना शुभेच्छा देण्यात आल्या. दुपारी सहकुटुंब सहपरिवार स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते, त्याचा सर्व कर्मचाऱ्यांनी सहकुटुंब आस्वाद घेतला.

सायंकाळी वर्धापन दिनाचा मुख्य सोहळा मनोरंजन केंद्र येथे आयोजित करण्यात आला होता. मुख्य अभियंता मा.श्री. कुमरवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सोहळ्यात वसाहतीमधील शाळेतील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. दीपप्रज्वलन करून सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. विविध स्पर्धांमधील उपविजेता व विजेता यांना पारितोषिक व चषक वितरीत करण्यात आले. सदर सोहळ्यात अधीक्षक अभियंता श्री. सुनील वाघ व श्री. प्रसन्नकुमार गरुड तसेच आयोजन समिती सचिव कार्यकारी अभियंता श्री. कामटे यांनी मार्गदर्शन केले व वर्धापन दिनानिमित्त आयोजित विविध उपक्रमांचे कौतुक केले. आयोजन समितीचे अध्यक्ष मुख्य अभियंता मा.श्री. कुमरवार यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात वर्धापन दिन आयोजनाची जबाबदारी उत्तमपणे पार पाडल्याबद्दल संचलन विभागात कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून विविध स्पर्धात उत्साहाने सहभाग नोंदवून अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात वर्धापन दिन साजरा केल्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले.

वर्धापन दिनानिमित्त महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे, संचालक (संचलन) मा.श्री. चंद्रकांत थोटवे, संचालक (प्रकल्प) मा.श्री. व्ही. थंगपांडियन, संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक तथा सल्लागार (खनिकर्म) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव, संचालक (मा.सं.) मा.श्री. मानवेंद्र रामटेके, सर्व कार्यकारी संचालक, सर्व वीज केंद्राचे मुख्य अभियंता व मुख्य महाव्यवस्थापक, मुख्यालयातील सर्व विभाग प्रमुख यांचे शुभेच्छा संदेश प्राप्त झाले त्यांचे वाचन करण्यात आले. सदर शुभेच्छा संदेशाबद्दल मुख्य अभियंता मा.श्री. कुमरवार यांनी सर्वांचे आभार मानले.

सौ. प्रियांका पाटील उप कार्यकारी अभियंता यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले तर अधीक्षक अभियंता श्री. प्रसन्नकुमार गरुड यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त करून सदर सोहळ्याची सांगता करण्यात आली.

## भाटघर जल विद्युत केंद्राचा ४४वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

भाटघर जल विद्युत केंद्राचा ४४वा वर्धापन दिन दि. १ मार्च २०२२ रोजी उत्साहात साजरा झाला. वर्धापन दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी सत्यनारायण पूजा व यंत्रपूजेने वर्धापन दिनाची सुरुवात झाली. वर्धापन दिनाचे औचित्य साधून वसाहतीतील बालगोपाळ व महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात सर्वांनी हिरिरीने सहभाग नोंदविला होता आणि सदर दिनी बक्षिसांचे वितरण सुध्दा करण्यात आले. बक्षिसांचे वितरण भाटघर ज.वि. केंद्राचे कार्यकारी अभियंता श्री. सुनील वाळेकर यांचे हस्ते करण्यात आले आणि त्यांनी याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन देखील केले. सदर कार्यक्रमात भाटघर ज.वि. केंद्राचे कर्मचारी आपल्या कुटुंबियांसह उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाटघर जलविद्युत केंद्राचे प्रमुख अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. ज्ञानेश्वर डोंगरे यांनी केले. याप्रसंगी श्री. हिंमत सुंदर भंडलकर, तंत्रज्ञ-३ यांचे सुपुत्र कु. सोहम ह्याने दमदार आवाजात पोवाडा सादर केला. तसेच उपस्थित कुटुंबियांनीही मनोगते व्यक्त केली.

या कार्यक्रमास विशेष उपस्थिती पानशेत विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. सुनिल मंडलिक हे सपत्नीक उपस्थित होते तसेच पुणे नवीकरणीय ऊर्जा मंडळाचे श्री. आंबटकर (चाचणी विभाग) व अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. तानाजी केरुरे उपस्थित होते. महाशिवरात्री निमित्त सर्वांनी स्वादिष्ट फराळाचा आस्वाद घेतला.

सांस्कृतिक कार्यक्रमाने वर्धापन दिनाचा समारोप वसाहतीतील करमणूक केंद्रात संपन्न झाला. यावेळेस बालगोपाळांनी विविध वेशभुषा सादर केल्या तसेच विद्युत केंद्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी गायन, वादन या कला सादर केल्या. सदर कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता भाटघर जलविद्युत केंद्राच्या सर्व अभियंते व कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात माँ जिजाऊ भोसले व स्वामी विवेकानंद यांची जयंती संपन्न

दि. १२ जानेवारी २०२२ रोजी परळी औष्णिक विद्युत केंद्र येथे प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली आदरणीय माँ जिजाऊ भोसले व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.

मुख्य अभियंता मा.श्री. आव्हाड ह्यांनी माँ जिजाऊ भोसले व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला माल्यार्पण अर्पण केले. या कार्यक्रमाप्रसंगी सर्वश्री. उपमुख्य अभियंता श्री अवचार, राठोड आणि अन्य वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात माँ जिजाऊ भोसले व स्वामी विवेकानंद यांची जयंती संपन्न

परळी औष्णिक विद्युत केंद्र येथे दि. १२ जानेवारी २०२२ रोजी प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात प्रभारी मुख्य अभियंता मा.श्री. आर.बी. गिरी यांच्या अध्यक्षतेखाली आदरणीय माँ जिजाऊ भोसले व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.

प्रभारी मुख्य अभियंता मा.श्री. गिरी ह्यांनी माँ जिजाऊ भोसले व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला माल्यार्पण अर्पण केले. या प्रसंगी विविध विभाग प्रमुख यांनी उपस्थित राहून माँ जिजाऊ भोसले व स्वामी विवेकानंद यांना अभिवादन व्यक्त केले.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात संत गाडगेबाबा महाराज यांची जयंती संपन्न

दि. २३ फेब्रुवारी २०२२ रोजी परळी औष्णिक विद्युत केंद्र येथे प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली संत गाडगेबाबा महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

मुख्य अभियंता मा.श्री. आव्हाड ह्यांनी संत गाडगेबाबा महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले आणि उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांना स्वच्छतेची शपथ दिली. या प्रसंगी सर्वश्री. अधीक्षक अभियंता श्री. एस.पी. राठोड, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. एन.के. चन्ने, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. आर.बी. पवार तसेच अन्य अधिकारी, कर्मचारी, महिला कर्मचारी व संघटना प्रतिनिधी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. महेंद्र शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. दिलीप वंजारी यांनी मांडले.

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात श्री. अरुण ऋषी स्वर्गीय यांच्या विषयावर कार्यशाळा संपन्न

नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात दि. २९ नोव्हेंबर २०२१ रोजी श्री. अरुण ऋषी स्वर्गीय यांचे एक दवा निराली, १५ सेकंद की ताली या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम क्रांतिवीर व्ही.एन. नाईक शाळा एकलहरे, स्टेज-२ सभागृह, प्रशासकीय इमारत तसेच ऑफिसर्स मनोरंजन केंद्र येथे अधिकारी-कर्मचारीवृंद आणि त्यांच्या कुटुंबियांकरिता आयोजित करण्यात आला होता.

सदर कार्यक्रमास मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे, उप मुख्य अभियंता (संचलन व सुव्यवस्था) श्री. बी.ए. पाटील, अधीक्षक अभियंता श्री. शशांक चव्हाण आणि अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी-कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कनिष्ठ अभियंता सौ. लिना पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन कार्यकारी अभियंता (प्रशिक्षण उपकेंद्र) श्री. ए.पी. नेटके यांनी मांडले.

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात राजमाता जिजाऊ भोसले आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती संपन्न

नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील प्रशासकीय इमारत, एच.ओ.डी. हॉल येथे दि. १२ जानेवारी २०२२ रोजी मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राजमाता जिजाऊ भोसले आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला.

मुख्य अभियंता मा.श्री. शिंदे यांनी राजमाता जिजाऊ भोसले आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन त्यांच्या जीवनकार्याबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना विशद केली.

याप्रसंगी वरिष्ठ अभियंते, अधिकारी - कर्मचारी आणि महिला कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन टंकलेखिका श्रीमती. शोभा व्यास यांनी केले.

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती संपन्न

नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील प्रशासकीय इमारत, एच.ओ.डी. हॉल येथे दि. २३ जानेवारी २०२२ रोजी मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला.

मुख्य अभियंता मा.श्री. शिंदे यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन त्यांच्या जीवनकार्याबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना विशद करण्यात आली.

याप्रसंगी वरिष्ठ अभियंते, अधिकारी - कर्मचारी आणि महिला कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन टंकलेखिका श्रीमती. शोभा व्यास यांनी केले.



## दोन हजार एकवीस

दोन हजार एकवीस
कसा गेला भाऊ
अदृश्य कोरोनाने
अर्धा घेतला खाऊ

आता तरी जागा
कधीतरी मानवा
वृक्ष लावून नित्य
प्राणवायु जेव्हा हवा

खोदल्या विहिरीला
पाणी नाही वेळेवर
पूर्वनियोजित महत्वाचे
उपाय केल्यावर

मानवात देव पहा
मंदिरात नाही सापडणार
त्याची मदत
सुख-दु:खात केल्यावर

मरणावर सर्वच हाय
हाय करतात
जिवंतपणी संकटी
का नाही विचारतात

दिस वर्षाचा शेवट
कसा निघावं सांगा
प्रेम आपुलकी सर्वांची
देवाला सुखी ठेवा मांगा

**- राजेश लक्ष्मण वऱ्हाडे**
एम.आय.एस. विभाग,
पारस औ.वि. केंद्र

## जगण्याचा भार



मित्रा, सोसवतो का तुला उद्याच्या जगण्याचा भार
की टक लावून बघत असतो नुसता
स्वप्नातील रंगवलेल्या भिंती
रोजच्या निघणाऱ्या धुरातून अक्राळविक्राळ झालेल्या या छटा
घाबरवत असतील तुलाही कधीतरी...

की कौलांचा आडोसा घेत आलेला सूर्य
कधी भिडला असेल तुझ्या पापण्यांशी आणि
जागली असेल तुझ्यातील उमेद
उद्याच्या जगण्याची इच्छेच्या पलीकडील...

जगण्याच्या शर्यतीत धूर्त झालेला तूच
कधी कर शर्यत स्वत:शीच जिंकण्याची
मग कळेल तुलाही जिंकणं आणि जगणं यातलं अंतर
नजरेच्या पल्ल्यापलीकडील...

**- वैशाली धनविजय**
तंत्रज्ञ-३, माहिती तंत्रज्ञान विभाग,
चंद्रपूर महाऔ.वि. केंद्र



## स्त्री शक्ती

हे नारी, तू जीवनदात्री आमची
तूच संध्या, तूच आमची सकाळ
तुझ्यामुळेच वर्तमान आमचे
तुझ्यामुळेच भूतकाळ ।। १ ।।

तूच आहेस स्त्रीशक्ती
तूच आमची पाठराखी
तूच आहेस भगिनी आमची
तूच आहेस सखी ।। २ ।।

अफाट आहे रुपे तुझी
अफाट आहे सहनशीलता
विरांगना तू रणमर्दानी
अफाट तुझी वीरता ।। ३ ।।

नाही तू असहाय्य आता
नाही तू अबला नारी
पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून
देशाच्या विकासातही योगदान भारी ।। ५ ।।

जीवनमरणाच्या वाटेवरती
नर नारी एकसमान
स्त्रीशक्तीचा जागर चालला जगभर
एक तीर, एक कमान ।। ६ ।।

**- धर्मेंद्र कन्नाके**
चंद्रपूर महाऔ.वि. केंद्र

## आत्मचिंतन

आत्मचिंतन आपले
आपणच करावे
नाही नाही म्हणता
दुखावले मन किती हेवेदावे

जरुरत असता कामा
कोणाच्या पडले
तन-मन-धनाने
सहकार्य कधी केले

चुकून चालता काय
पायाखाली दबले
मुंगी किडे चुकून
त्यावर पाय पडले

गाडी चालवता अपघात
कुणा उडवले
प्राणी असो मानव
जबाबदार आपण त्याले

आई वडिलधारी
आज्ञेत तरी वागले
सेवा करुन आशिर्वाद
का नाही कधी घेतले

**- राजेश लक्ष्मण वऱ्हाडे**
एम.आय.एस. विभाग,
पारस औ.वि. केंद्र





## ती मागायला येणारी...

आभासी जाणिवांच्या
गर्दीत घोळ दिसला
वरवर पाहिले, पण
आवाज खोल दिसला

उथळ तिच्या कपाळी
तपकिरी रेख दिसली
सूर्यासम झळाळी
ह्रदयात ओल दिसली

नयनात भाष्य दिसले
होते विनविणारे शब्द
हवा फक्त, पोटाचाच घास
दिसले स्वाभिमानी अब्द

होती खेळणारीच पोर
चढानं खूप दिसली
पण लढून पेलणारी
कामिनी ती दिसली

त्या काळात तिच्या रंगात
अंतरंग उठून दिसले
फक्त दोन आणं ताटात
तिचे लाखात मोल दिसले...

**- वैशाली धनविजय**
तंत्रज्ञ-३, माहिती तंत्रज्ञान विभाग,
चंद्रपूर महाऔ.वि. केंद्र

## चारोळ्या

तुझ्या असंख्य मित्रांमध्ये
मला गणू नकोस ।
रस्त्यावर पडलेल्या फुलाला
पायाखाली तुडवू नकोस ।।

सूर्याच्या असंख्य किरणांनी
दिवस उजळून निघतो ।
तुझ्या त्या बेवफाईमुळे
दिवसरात्र जळून निघतो ।।

अबोल होतो मी
बोलके करुन गेलीस मला ।
वळवाच्या सरी सारखे
मनाला सुखवून गेलीस मला ।।

सागरावर रोखली नजर
तर नजर ठरत नाही ।
तुझ्यावर रोखली नजर
तर नजर हटत नाही ।।

आपण आपले पण
दुसऱ्यावर जीव लावून बसतो ।
त्याने फसविल्यावर
त्याच्याच विचारात गडून बसतो ।।

जन्मोजन्मी तुझीच मी
असे मला सांगायचीस ।
पहिल्याच जन्मात तू
दुसऱ्याची पत्नी होऊन गेलीस ।।

**- सुर्यकांत चंद्रकांत वाघमारे**
तंत्रज्ञ -३, वाहन विभाग
कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोपळी







दि. ३ जानेवारी २०२२ रोजी परळी औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.



दि. १२ जानेवारी २०२२ रोजी परळी औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली माँ. जिजाऊ भोसले व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.




दि. ३ जानेवारी २०२२ रोजी पारस औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.




दि. १२ जानेवारी २०२२ रोजी पारस औ.वि. केंद्रात प्रभारी मुख्य अभियंता मा.श्री. आर.बी. गिरी यांच्या अध्यक्षतेखाली माँ. जिजाऊ भोसले व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.



दि. २३ जानेवारी २०२२ रोजी परळी औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारी वृंद.



दि. १५ फेब्रुवारी २०२२ रोजी कोयना जल विद्युत केंद्र संकुल येथे मुख्य अभियंता मा.श्री. एस.जी. चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.




दि. २७ डिसेंबर २०२१ रोजी पारस औ.वि. केंद्रात प्रभारी मुख्य अभियंता मा.श्री. आर.बी. गिरी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.





दि. १५ फेब्रुवारी २०२२ रोजी परळी औ.वि. केंद्र येथे प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात मुख्य अभियंता (प्रभारी) मा.श्री. शाम राठोड यांच्या अध्यक्षतेखाली संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.




दि. १५ फेब्रुवारी २०२२ रोजी पारस औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.



दि. १५ फेब्रुवारी २०२२ रोजी परळी औ.वि. केंद्रात प्रभारी उप मुख्य अभियंता (प्रशासन) श्री. एच.के. अवचार यांच्या अध्यक्षतेखाली संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.



दि. २३ फेब्रुवारी २०२२ रोजी कोयना जल विद्युत केंद्र संकुल येथील सह्याद्री प्रशासकीय इमारतीमध्ये मुख्य अभियंता मा.श्री. एस.जी. चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.




दि. १९ फेब्रुवारी २०२२ रोजी पारस औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.






दि. १९ फेब्रुवारी २०२२ रोजी कोयना जल विद्युत केंद्र संकुल येथील सह्याद्री प्रशासकीय इमारत सभागृहामध्ये मुख्य अभियंता मा.श्री. एस.जी. चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.





परळी औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.




पारस औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली संत रविदास महाराज आणि संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.




दि. २७ डिसेंबर २०२१ रोजी नाशिक औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली भाऊसाहेब उर्फ डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न













दि. २६ जानेवारी २०२२ रोजी परळी औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करुन ७३वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्याप्रसंगीची ही काही क्षणचित्रे.




दि. १२ जानेवारी २०२२ रोजी नाशिक औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली माँ जिजाऊ भोसले व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.




दि. १२ मार्च २०२२ रोजी पारस औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.




दि. २७ फेब्रुवारी २०२२ रोजी पारस औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री.विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली संत रविदास महाराज आणि संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.




दि. ३ जानेवारी २०२२ रोजी नाशिक औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.




दि. २३ जानेवारी २०२२ रोजी नाशिक औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारीवृंद.




दि. १९ फेब्रुवारी २०२२ रोजी पारस औ.वि. केंद्रात मुख्य अभियंता मा.श्री. विठ्ठल खटारे यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारीवृंद.



दि. १२ मार्च २०२२ रोजी परळी औ.वि. केंद्रात प्रभारी मुख्य अभियंता मा.श्री. एस.पी. राठोड यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.




दि. १५ फेब्रुवारी २०२२ रोजी नाशिक औ.वि. केंद्र येथे मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी उपस्थित अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी, कर्मचारीवृंद.

## कोराडी प्रशिक्षण केंद्रात महानिर्मितीचे संचालक (मानव संसाधन) मा.डॉ. मानवेंद्र रामटेके यांचा विशेष गुणसंवर्धन कार्यशाळेचा उपक्रम संपन्न







महानिर्मितीच्या अधिकाऱ्यांच्या गुणसंवर्धनासाठी म्हणजेच मानव संसाधनाच्या विकासासाठी महानिर्मितीचे संचालक (मानव संसाधन) मा.डॉ. मानवेंद्र रामटेके ह्यांनी कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या सभागृहात विशेष गुणसंवर्धन कार्यशाळेचा उपक्रम सुरु केला. सदर कार्यशाळेत कोराडी औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. प्रकाश खंडारे, कोराडी प्रशिक्षण केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. राजकुमार तासकर, खापरखेडा औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. राजू घुगे तसेच कोराडी प्रकल्प, निर्मिती बांधकाम, कोळसा विभाग आणि कोराडी स्थापत्य विभागातील अधिकारी-अभियंत्यांनी सदर कार्यशाळेत सहभागी झाले होते. त्याप्रसंगीही ही काही छायाचित्रे.




## भाटघर जलविद्युत केंद्राचा ४४वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न





दि. १ मार्च २०२२ रोजी भाटघर जलविद्युत केंद्राचा ४४वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी वसाहतीतील बालगोपाळ व महिलांसाठी सांस्कृतिक उपक्रमांचे तसेच बक्षिस समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.

# उरण वायु विद्युत केंद्राचा ४०वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न


















उरण वायु विद्युत केंद्राच्या ४०व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून मुख्य अभियंता मा.श्री. गिरीश कुमारवार यांचे अध्यक्षतेखाली वीज केंद्रातील अधिकारी-कर्मचारी तसेच वसाहतीतील विद्यार्थी व रहिवाश्यांसाठी विविध क्रीडा-शैक्षणिक-सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सदर वर्धापन दिनानिमित्त ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधाताई पाटकर तसेच सानेगुरुजी राष्ट्रीय स्मारकाचे अध्यक्ष संजय मं. गो यांना विशेष निमंत्रित करण्यात आले होते, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.









# गौरव - अभिनंदन



नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२५व्या जन्मदिवसाचे औचित्य साधून पारस औष्णिक विद्युत केंद्रातील उप कार्यकारी अभियंता श्री. अंबरीश पुंडलिक यांनी लिहिलेले सुभाष बावनी हे पुस्तक सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनचरित्रावर प्रकाशित करण्यात आले. सदर पुस्तक मोरया प्रकाशनद्वारे प्रकाशित करण्यात आले.



पारस औष्णिक विद्युत केंद्रातील अधिकारी श्री. राजेश नरसिमलु गट्टूवार, प्रभारी अधीक्षक अभियंता यांचे पाल्य कु. यश हा राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली अंतर्गत राबविण्यात आलेल्या राष्ट्रीय बुद्धीमत्ता शोध – स्टेज २ परीक्षा उत्तीर्ण झालेला असून शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरला आहे. सदर परीक्षा संपूर्ण भारतात प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन बुद्धिमान विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने त्यांना आर्थिक सहाय्य करावे या साऱ्यातून त्यांची बुद्धिमत्ता विकसित व्हावी आणि त्या विकसित बुद्धिमत्तेने त्या विद्यार्थ्यांनी आपली विद्याशाखा व राष्ट्र यांची सेवा करावी या उद्देशाने राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांचे मार्फत संपूर्ण देशात ही परीक्षा घेण्यात येते.

कु. यश राजेश गट्टूवार सध्या इयत्ता १२वी विज्ञान शाखेत असून पारस येथील महात्मा फुले विद्यालय येथे शिक्षण घेत आहे.




महानिर्मितीच्या भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रात कार्यरत श्री. निलेश शिंदे आणि त्यांचा मित्र ओम हिंगणे, शेगाव या दोघांनी दि. २७ डिसेंबर २०२१ रोजी पुणे येथून "Pedal For The Earth" हा संदेश घेऊन सुरू केलेला सायकल प्रवास दि. ९ जानेवारी २०२० रोजी कन्याकुमारीला पूर्ण केला.

"पाहिलेलं स्वप्न खूप गोड असत पण प्रत्यक्षात उतरताना त्याची खूप मोठी किंमत मोजावी लागते, मग ती शारीरिक क्षमतेची किंवा मानसिकतेची असो, पण यात खरंतर थोरांचे आशिर्वाद तसेच सहकाऱ्यांचे प्रोत्साहन, आणि सगळ्यात महत्वाचं म्हणजे आपल्या माणसांच्या सोबतीमुळे तर ही स्वप्नपूर्ती साकारण्यात यश मिळतं", अशा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.



नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील संच क्र. ४ येथे उप कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत असलेले श्री. आनंदगिर पितांबर गोसावी ह्यांनी दि. २७ सप्टेंबर २०२१ ते ०१ ऑक्टोबर २०२१ दरम्यान यशवंतराव चव्हाण ॲकेडमी ऑफ डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशन (यशदा) पुणे येथे डी.ओ.पी.टी. तर्फे राष्ट्रीय पातळीवरचा डिझाईन ऑफ ट्रेनिंग हा कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केला आहे.



चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात तंत्रज्ञ–२ या पदावर कार्यरत असलेले श्री. परशुराम ईश्वर गोवर्धन यांचा पाल्य कु. परम हा NEET-2021 परिक्षेत ५७९ गुण मिळविले असून त्याला M.B.B.S. शिक्षणासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे प्रवेश प्राप्त झाला आहे.

## उरण वायु विद्युत केंद्रास ग्रीनटेक सेफ्टी इंडिया तर्फे सेफ्टी एक्सलन्स पुरस्काराने सन्मानित










उरण वायु विद्युत केंद्रास ग्रीनटेक सेफ्टी इंडिया तर्फे सेफ्टी एक्सलन्स पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी उरण वायु.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. गिरीश कुमारवार व अधीक्षक अभियंते सर्वश्री. पी.बी. गरुड आणि एस.एल. वाघ ह्यांनी पुरस्कार स्वीकारला, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न








परळी औष्णिक विद्युत केंद्रात जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्रीडा - शैक्षणिक - सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रसंगी परळी औ.वि. केंद्रातील महिला अधिकारी-कर्मचारी आणि वसाहतीतील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.





## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न






नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात प्रभारी मुख्य अभियंता मा.श्री. बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ध्वजारोहण करुन प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न झाला. त्यावेळी नाशिक औ.वि. केंद्रातील दवाखान्यातील सर्व अधिकारी-कर्मचारी यांचा कोरोना योध्दा म्हणून सन्मान करण्यात आला, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.

## वीज बिल भर...

भर बाबा भर... वीज बिल भर...
नाही भरले, वीज बिल तर ?
अंधारात जाईल, सारे घर
भर बाबा भर... वीज बिल भर...
शेती असो वा कारखाने,
गिरणी असो वा दवाखाने,
छोटी मोठी आहे दुकाने,
वीज बिल भरु आनंदाने,
वीज जपून वापरा,
काका–मामा, वाढणार नाही दर
जल विद्युत धरणे मोठी,
कोळशातून होते निर्मिती,
भर बाबा भर... वीज बिल भर...
वायु आणि पवन देती,
ऊर्जा आपल्या राज्यासाठी,
कुटुंब सारे मिळून, करु देशाला बेहत्तर...
भर बाबा भर... वीज बिल भर...
नाही भरले, वीज बिल तर ?
अंधारात जाईल, सारे घर
भर बाबा भर... वीज बिल भर...

**– राजेश अंबादास पवार**
उप व्यवस्थापक (वित्त व लेखा),
भुसावळ औ.वि. केंद्र






## जिन्दगी

अभी एक पहेली सी है जिन्दगी
कुछ तेरी उम्मीदें, कुछ मेरी आँस है जिन्दगी
बिखरे पडे है सपनों के मंजर कई,
कहीं दिलों में दबे जज्बात है जिन्दगी ।
तेरी समझ से परे रहीं बातें मेरी
बस बंद होठों मे सिमटे अल्फाज है जिन्दगी
हम आज भी वहीं है जहाँ बिछडे थे
बस तेरे बदलते मिजाज है जिन्दगी ।
नन्हे से दिल में कितने अरमान सजाए
बस ऐसे ही कितने 'काश' है जिन्दगी
कुछ मोड ऐसे आए, जहाँ जिन्दगी रुक सी गई
रुक कर चलने का ही तो अन्दाज है जिन्दगी ।
कई इल्जामों जख्म मिले अपनों से
उन्हीं जख्मों को छिपाने का लिबास है जिन्दगी
निकले भी आह तो बयां कैसे करें
सबकुछ सहने में हुनरबाज है जिन्दगी ।
तमन्नाओं के बाजार में सब दांव पर है,
सबकुछ पाने को बेकरार है जिन्दगी
यूँ तो कई लफ्ज लिखे है इस कलम ने
फिर भी लगता है जैसे तलबगार है जिन्दगी ।

**– सौ. सुनिता शांताराम पाटील**
**द्वारा : शांताराम प्रतापराव पाटील,**
वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा),
भुसावळ औ.वि. केंद्र

# घास

वाघुळे उन्हाला बसली
पाण्यास जणू उपवास
घनपारावर कावळा
अर्धाच सोडतो घास

रात्रींना निमूट शरण
प्रत्येक दिवस का जावा
का रोज अभागी वेळी
क्षितिजाचा पाय तुटावा

चंद्राचा लंबक हलता
अंधार मनोरा झाला
की राजहंस बगळ्यांतील
कावळ्यांसवे उडाला ?

पाहून दुरुन हे सारे
पोटात घेऊनी बिंबे
विधवा नदीच्या माथी
ही नवी कशाची टिंबे ?

**- प्रिन्स (महेश आफळे),**
जनसंपर्क अधिकारी,
सांघिक कार्यालय, मुंबई.





# चटका

उन्हाने नेहमीच साथ दिली
दिले उघड्या आकाशाने पंख
अश्याच तापलेल्या मातीत चालताना
परिस्थितीच्या पायांना कुठली खंत

परिस्थितीने फक्त पायच दिले
नाही दिल्या चपला
चटका तर एकटाच होता
म्हणणारा आपला

चटक्याची व माझी मैत्री
खुप गोड वाटे
आमच्या मैत्रीचे दाखले
पायावर लाल होऊन साठे

पण आज चुकलो मी
वेदना पडल्या भारी
चटक्याची मैत्री विसरुन
चपलाची केली चोरी

माझ्या चोरीचा चटका
चटक्यालाच लागला फार
बोलला चपलाचा थंडावा जिंकणे तुझे
पण चोरी माझीच हार

परिस्थिती नाही बदलणार
वेळ बदलेल थोडा फार
चोरीला कुशीत घेऊन मित्रा
सांग स्वत:ला कुठे शोधणार

काय मिळाले तुला
सुख तर पुढेच आहे
चालणे फक्त काम तुझे
चटके फार थोडेच आहे

खरंतर आपली मैत्री
आहे काही क्षण
काढ कधी एकटा असताना
या चटक्याचीही आठवण

**- प्रवीण दिलीप भोईर**
व्यवस्थापक (वित्त व लेखा),
सांघिक कार्यालय,मुंबई

## सांघिक कार्यालय, मुंबई येथे महिला दिन उत्साहात संपन्न

"महिलांना समानतेचा अधिकार मिळण्यासाठी सरकारकडून खूप प्रयत्न केले जातात. मात्र अधिकार ही देण्याची गोष्ट नाही, तो मिळवावा लागतो. महिलांनी सावित्रीबाई फुले यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून स्वत:चे अधिकार मिळवावेत," असे आवाहन महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) मा.श्री. व्ही. थांगपंडियन यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त दि. ८ मार्च २०२२ रोजी वांद्रे येथील प्रकाशगड कार्यालयाच्या प्रेक्षागृहात महानिर्मितीतर्फे आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर महानिर्मितीचे संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (मानव संसाधन) मा.डॉ. मानवेंद्र रामटेके प्रामुख्याने उपस्थित होते.

"महिलांमध्ये जन्मत:च प्रचंड ऊर्जा व शक्ती आहे. त्याचा वापर केल्यास महिला त्यांचे ध्येय सहज गाठू शकतात," असेही श्री. थांगपंडियन म्हणाले. समाजामध्ये अजूनही मुलगा-मुलगी असा भेदाभेद केला जात असल्याबद्दल संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे यांनी खंत व्यक्त केली. कोरोना काळात महानिर्मितीच्या उत्कृष्ट कामगिरीमध्ये महिला अधिकारी, कर्मचाऱ्यांनी बरोबरीने मोठे योगदान दिल्याबद्दल त्यांनी कौतुक केले.

महिलांमुळे प्रत्येकाच्या जीवनात इंद्रधनुष्याचे रंग आहेत. त्यामुळे महिला दिन केवळ एक दिवस नव्हे तर प्रत्येक दिवशी साजरा करण्याची गरज असल्याचे संचालक (मानव संसाधन) मा.डॉ. मानवेंद्र रामटेके यांनी सांगितले. सदर प्रसंगी प्रारंभी माननीय अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. संजय खंदारे यांच्या शुभेच्छापर संदेशाचे देखील वाचन करण्यात आले.

या अभिनव कार्यक्रमात आकाशवाणीच्या सुप्रसिद्ध निवेदिका व रेडिओ जॉकी अनघा मोडक यांनी यावेळी ''जगण्याचे गाणे होताना'' हा अतिशय सुंदर कार्यक्रम सादर केला. अकस्मात दृष्टी हरवल्यानंतर या संकटाला सामोरे जाताना आलेले अनेक अनुभव मांडत असताना त्यांनी सकारात्मक विचार आणि कृती यांचे महत्व विशद केले. आपल्या ओघवत्या शैलीत अनघा मोडक यांनी महिला कर्मचारी, अधिकाऱ्यांसह उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

याप्रसंगी महिला कर्मचाऱ्यांसाठी संचालक (मानव संसाधन) डॉ. रामटेके व सौ. रामटेके यांनी खास संचालित केलेला चित्रपटांवर आधारित अभिनव प्रश्नमंजुषा आणि तद्नंतर सांस्कृतिक-सांगीतिक कार्यक्रम घेण्यात आला. दहा गटांमध्ये घेण्यात आलेल्या या कार्यक्रमास प्रत्येक फेरीनंतर उपस्थितांची उत्सुकता वाढविण्यात व त्यांना अभिव्यक्त करण्यात यशस्वी झाला. या प्रश्नमंजुषा कार्यक्रमासाठी मानव संसाधन विभागाचे श्री. कौस्तुभ इंगवले आणि त्यांच्या चमूने विशेष सहकार्य केले.

कला ही केवळ स्वांतसुखाय नसून त्यातून भवताली आनंद निर्माण होणे हेही गरजेचे असते. याच भावनेतून प्रकाशगड मुख्यालय येथील कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेत सांगितीक मेजवानी दिली. सदर सांगितीक कार्यक्रमासाठी श्री. राहुल सोहोनी, नितीन जोगळेकर, अलोक भारती यांनी विशेष मेहनत घेतली.

सदर कार्यक्रमामध्ये मुख्यालय येथील कार्यरत महिला कर्मचारी यांना संचालक (मानव संसाधन) डॉ. रामटेके यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महानिर्मितीचे मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. आनंद कोंत यांनी केले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचलन सहाय्यक जनसंपर्क अधिकारी श्री. संतोष पुरोहित यांनी केले. मुलगा किंवा मुलगी जन्माला येताच अगदी आनंद व्यक्त करतानाही त्यानुसार पेढे किंवा बर्फी वाटपासारख्या प्रथेतून आपण सर्वच जण एकप्रकारे जन्मजात भेदभाव निर्माण करतो याकडे लक्ष वेधून त्यांनी उपस्थिताना अंतर्मुख केले.

या संपूर्ण कार्यक्रमास महानिर्मितीचे कार्यकारी संचालक वर्ग सर्वश्री. कार्यकारी संचालक (प्रकल्प) मा.श्री. संजय मारुडकर, प्रभारी कार्यकारी संचालक (सौर, अपारंपारिक ऊर्जा (प्रकल्प) आणि सांघिक नियोजन व सुसंवाद) मा.श्री. राजेश पाटील, कार्यकारी संचालक (पर्यावरण व सुरक्षा) आणि (गारे पालमा) मा.श्री. नितीन वाघ, कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान) नितीन चांदूरकर तसेच मुख्यालयातील मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक व वरिष्ठ अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमास महानिर्मितीच्या महिला कर्मचारी वर्गाचा भरघोस प्रतिसाद मिळाला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी महानिर्मितीच्या मानव संसाधन विभागाने व जनसंपर्क कक्षाने विशेष परिश्रम घेतले.

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती संपन्न

नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील प्रशासकीय इमारत, एच.ओ.डी. हॉल येथे दि. ८ डिसेंबर २०२१ रोजी मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संत संताजी जगनाडे महाराज यांच्या ३९७वी जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला.

मुख्य अभियंता मा.श्री. शिंदे यांनी संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन त्यांच्या जीवनकार्याबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना विशद केली.

याप्रसंगी वरिष्ठ अभियंते, अधिकारी - कर्मचारी आणि महिला कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन टंकलेखिका श्रीमती. शोभा व्यास यांनी केले.

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन संपन्न

नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील प्रशासकीय इमारत, एच.ओ.डी. हॉल येथे दि. ६ डिसेंबर २०२१ रोजी मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला.

मुख्य अभियंता मा.श्री. शिंदे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण केले. याप्रसंगी सामुहिक बुध्द वंदना घेण्यात आली. तंत्रज्ञ-१ श्री. शशिकांत पवार ह्यांनी बुध्द वंदना घेतली.

याप्रसंगी वरिष्ठ अभियंते, अधिकारी - कर्मचारी आणि महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन लघुलेखक श्री. अनिल कांबळे यांनी केले.

## आम्ही आपले आभारी आहोत

**कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**जानेवारी २०२२ :**

(१) श्री. पार्श्वनाथ भुपाल शेटे – उप कार्यकारी अभियंता.

**फेब्रुवारी २०२२ :**

(१) श्री. उदय संभाजी भोसले – कनिष्ठ आरेखक.

**पारस औष्णिक विद्युत केंद्रातून माहे फेब्रुवारी २०२२ मध्ये सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

(१) श्री. सतीश निवृत्ती भिरुड – तंत्रज्ञ-२.

**नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**डिसेंबर २०२१ :-**

(१) श्री. हेमंत श्रीनिवास जोशी – उप कार्यकारी अभियंता, संच क्र.३, (२) श्री. अशोक बाबुराव ढोकरे – उप कार्यकारी अभियंता, संच क्र. ५.

**जानेवारी २०२२ :-**

(१) श्री. कांतीलाल सुरजमल वर्मा – उप कार्यकारी अभियंता, संच क्र. ४, (२) श्री. मिलींद काशीनाथ चव्हाण – सहाय्यक अभियंता, संच क्र. ३, (३) श्रीमती. विमल अरुण गुंजाळ – उच्चस्तर लिपीक (मा.सं.), (४) श्री. रतन महादु गोवर्धने – अग्निशामक, अग्निशमन विभाग.

## आपण यांना अंतरलो

**१) कै. बुलुसू व्यंकटश्रीराम मूर्ती - उप व्यवस्थापक (वि. व ले.),**
लेखाविभाग, नाशिक औष्णिक विद्युत केंद्र,
**मृत्यु दिनांक : १९/११/२०२१.**

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात यशवंतराव चव्हाण यांची जयंती संपन्न

परळी औष्णिक विद्युत केंद्र येथे प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात दि. १२ मार्च २०२२ रोजी प्रभारी मुख्य अभियंता मा.श्री. एस.पी. राठोड यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला.

मुख्य अभियंता मा.श्री. राठोड यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन त्यांच्या जीवनकार्याबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना विशद करण्यात आली.

याप्रसंगी वरिष्ठ अभियंते, अधिकारी – कर्मचारी आणि महिला कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. के.एच. गित्ते व आभार प्रदर्शन श्री. आर.बी. गजले यांनी केले.

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती संपन्न

नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील प्रशासकीय इमारत, एच.ओ.डी. हॉल येथे दि. ३ जानेवारी २०२२ रोजी मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९१व्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला.

मुख्य अभियंता मा.श्री. शिंदे यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन त्यांच्या जीवनकार्याबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना विशद करण्यात आली.

याप्रसंगी वरिष्ठ अभियंते, अधिकारी – कर्मचारी आणि महिला कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन लघुलेखक श्री. अनिल दिगंबर कांबळे यांनी केले.

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात संत सेवालाल महाराज यांची जयंती संपन्न

नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील प्रशासकीय इमारत, एच.ओ.डी. हॉल येथे दि. १५ फेब्रुवारी २०२२ रोजी मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम संपन्न झाला.

मुख्य अभियंता मा.श्री. शिंदे यांनी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन त्यांच्या जीवनकार्याबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना विशद केली.

याप्रसंगी वरिष्ठ अभियंते, अधिकारी – कर्मचारी आणि महिला कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन टंकलेखिका श्रीमती. शोभा व्यास यांनी केले.

## प्रतिक्रिया

आपला महानिर्मितीचा सृजन जून-ऑगस्ट हा अंक वाचला. अतिशय वैविध्यपूर्ण असे विषयवार बाजू अंतर्भुत असलेले आपले मासिक संपूर्ण महानिर्मिती कंपनीला भावनिक आणि सामाजिक बांधिलकी देणारे असे वाटले. आज पुन्हा अंक नजरेसमोर आला आणि संपादकीय लिखाण वाचण्यात आले. आपण अगदी मोजक्या शब्दांत अनेकांचे ऋणानुबंध जपत आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव करुन देत नवीन लेखकांना आमंत्रित केलं त्याबद्दल आपले मनापासून आभार...

धन्यवाद !

**– वैशाली धनविजय रामटेके**
**तंत्रज्ञ-३, माहिती तंत्रज्ञान विभाग,**
**चंद्रपूर महाऔ.वि. केंद्र**

# सिनेमा आणि शहीद-ए-आजम

- संतोष पुरोहित,
सहाय्यक जनसंपर्क अधिकारी,
सांघिक कार्यालय, मुंबई,



आगरा येथील वास्तव्यास असताना एकदा चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, सुखदेव, राजगुरु, बटुकेश्वर दत, शिव शर्मा, विजय कुमार सिन्हा, जयदेव कपूर, डॉ. गया प्रसाद, वैशंपायन आणि सदाशिव यांची एकत्र बैठक चालू होती. हास्यविनोद चालू होते. विनोदाचा विषय होता कोण कसे पकडला जाईल, पकडले गेल्यावर कोण काय करेल.

राजगुरु झोपेतच पकडले जातील, जनाब चालता चालता झोपतात. पोलिस कस्टडीत त्यांचे डोळे उघडतील आणि ते पोलिसांनाच विचारतील ''खरंच मी पकडला गेलो आहे की स्वप्न पाहतोय?''

मोहन (बटुकेश्वर दत) हे चांदण्या रात्री चंद्र पाहत असताना पकडले जातील आणि पोलिसांना म्हणतील, ''काही हरकत नाही, पण चंद्र सुंदर आहे!''

पंडितजी (चंद्रशेखर आझाद) बुंदेलखंड मधील डोंगरात शिकार करताना विश्वासघात होऊन पकडले जातील.

बच्चू (विजय कुमार सिन्हा) आणि रणजित (भगतसिंग) हे कुठल्या तरी सिनेमा हॉल मध्ये पकडले जातील आणि पकडले गेल्यावर पोलिसांना म्हणतील, ''पकडलं तर काय झालं, एवढा सिनेमा तर पुरा बघू दे!''

विषय चेष्टेचा असला तरी भगत सिंग यांचे सिनेमावरील प्रेम असेच होते. एच.एस.आर.ए. अर्थात हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशनचे प्रमुख चंद्रशेखर आझाद यांनी सिनेमागृहामध्ये न जाण्याबाबत सदस्यांना खूप कडक सूचना दिल्या होत्या. त्या काळात पोलिस, सी.आय.डी. यांची सिनेमागृहावरती कडक नजर असे. त्या काळात दलातील सदस्यांना रात्रीचे जेवण आणि सकाळचा नाश्ता यासाठी संघटनेतर्फे पैसे दिले जायचे. एकदा भगत सिंग, विजय कुमार सिन्हा लाहोर येथील ब्रेडला हॉल येथे क्रांतिकारकांना श्रध्दांजली सभा होती तेथे गेले होते. परत येताना त्यांनी "टॉम काका की कुटिया" (Uncle Tom's Cabin) या सिनेमाचे पोस्टर बघितले. या चित्रपटात अमेरिकेतील हबशी गुलाम यांच्यावरील अन्याय आणि त्यांचा संघर्ष याचे चित्रण केले होते. भगत सिंग यांनी चित्रपट पाहण्याचे ठरविले मात्र प्रश्न पैश्याचा होता. शेवटी जेवण आणि सकाळच्या नाश्त्याचे असलेले पैसे वापरुन त्यांनी सिनेमा पाहिला.

सिनेमा पाहून झाला, रात्रीचा उपास तर होणार होताच मात्र सकाळचा पण उपास हे कठीण जाणार होते, मग दोघांची चर्चा झाली आणि हा सिनेमा प्रत्येक क्रांतिकारकाने पाहणे कसे गरजेचे आहे हे, पंडितजींना पटवून द्यायचे ठरले. जेव्हा ते घरी आले तेव्हा भगत सिंग यांनी चित्रपटाची कथा प्रथम चंद्रशेखर आझाद यांना ऐकवली आणि नंतर क्रांतिकारकाने हा चित्रपट पाहणे कसे गरजेचे आहे हे सांगितले. भगत सिंग यांचे संभाषण इतके स्नेहपूर्ण असे की, ऐकताच आझाद फक्त हसले आणि त्यांचा राग निघून गेला. अर्थात दोघांना जेवण आणि नाश्त्याचे पैसे पुन्हा मिळाले.

******

प्रशासकीय वृत्त

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकात्मता दिन संपन्न

नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील स्टेज-२ सभागृह येथे दि. १९ नोव्हेंबर २०२१ रोजी श्रीमती. इंदिरा गांधी यांच्या १०४वी जयंतीनिमित्त राष्ट्री एकात्मता दिन साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी व प्रमुख पाहुणे म्हणून संचालक तथा सल्लागार (खनिकर्म) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव आणि मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे हे उपस्थित होते.

सदर प्रसंगी मुख्य अभियंता मा.श्री. शिंदे यांनी श्रीमती. इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन त्यांच्या जीवनकार्याबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना विशद करण्यात आली. त्यानंतर संचालक तथा सल्लागार (खनिकर्म) मा.श्री. पुरुषोत्तम जाधव ह्यांनी उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त सामुदायिक शपथ दिली.

याप्रसंगी वरिष्ठ अभियंते, अधिकारी - कर्मचारी आणि महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन कल्याण अधिकारी श्री. निवृत्ती कोंडावले यांनी केले.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात शिवजयंती उत्साहात संपन्न

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी परळी औष्णिक विद्युत केंद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९२वी जयंती उत्सव शासनाच्या कोरोना (कोविड-१९) नियम/निर्देशांचे पालन करुन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त दि. १३ फेब्रुवारी २०२२ ते १९ फेब्रुवारी २०२२ या कालावधीत जिजाऊ चषक, विविध क्रीडा स्पर्धा, चित्रकला, रांगोळी, वेषभुषा स्पर्धा व इतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक १७ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रा. अरविंद घोगरे पाटील, जालना यांनी शाहिरी पोवाडा हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन शिवरायांची जाज्ज्वल्य शौर्यगाथा वसाहतीमधील रहिवाशी, कर्मचारी व अधिकारी यांनी अनुभवली दि. १५ व १६ फेब्रुवारी रोजी बुध्दीबळ, बॅडमिंटन व व्हॉलीबॉल स्पर्धा घेण्यात आली. दि. १७ व १८ फेब्रुवारी २०२२ रोजी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी चित्रकला, रांगोळी, वेशभूषा स्पर्धा व विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

शिवजयंतीचे औचित्य साधून दिनांक १९ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी २१० मेगावॅट जुने औ.वि. केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वार येथे सुरक्षा विभागातील कर्मचाऱ्यांच्या वतीने जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्त मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तद्नंतर प्रशासकीय कार्यालयाच्या सभागृहात शासकीय जयंतीचे आयोजन सर्व अधिकारी-कर्मचारी अभियंता यांच्या उपस्थितीत करण्यात आले, या प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस मुख्य अभियंता मा.श्री. आव्हाड यांच्या हस्ते माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी प्रभारी उप मुख्य अभियंता श्री एच.के. अवचार यांनी जिजाऊ वंदना सादर केली. तसेच कार्यकारी अभियंता श्री. धनंजय कोकाटे, कल्याण अधिकारी श्री. दिलीप वंजारी व श्री. संदीप काळे यांनी शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकून शिवाजी महाराजांचा प्रेरणादायी इतिहास उपस्थितांसमोर मांडला. अध्यक्षीय भाषणात मुख्य अभियंता मा.श्री. आव्हाड यांनी शिवाजी महाराजांचे कुशल आणि आदर्श नेतृत्व कसे होते ते संदर्भासह सांगून त्याप्रमाणे परळी औष्णिक विद्युत केंद्राचे कामकाज करण्यासाठी सर्व अधिकारी अभियंते यांनी तत्पर असले पाहिजे असे आवाहन उपस्थित कर्मचाऱ्यांना केले.

शिवजयंती उत्सव - २०२२ निमित्त दिनांक १९ फेब्रुवारी २०२२ रोजी सायंकाळी शिवचरित्रकार ॲड. स्वाती नखाते पाटील यांचे जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी विचारमंचावर मुख्य अभियंता मा.श्री. मोहन आव्हाड, प्रभारी उप मुख्य अभियंता श्री. एच.के. अवचार, श्री. एस.पी. राठोड, अधीक्षक अभियंता श्री. डी.जी. इंगळे, सी.आर. होळंबे, कल्याण अधिकारी श्री. दिलीप वंजारी तसेच शिवजयंती उत्सव समितीचे कार्यकारिणी आणि पदाधिकारी उपस्थित होते. वरील सर्व कार्यक्रमास वीज केंद्रातील अधिकारी, कर्मचारी, अभियंते व सर्व संघटना प्रतिनिधी तसेच कर्मचाऱ्यांचे कुटुंबिय उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्याने शिवजयंती उत्सव-२०२२ स्फूर्तीदायी ठरला. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री. तुकाराम पाटील, प्रकाश चव्हाण यांनी तर आभार प्रदर्शन श्री. संदिप पाटील यांनी मांडले.

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात प्रजासत्ताक दिनानिमित्त कोरोना योध्दांचा गौरव

नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात ७३वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रभारी मुख्य अभियंता मा.श्री. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी सुरक्षा अधिकारी, मेस्को गार्ड, सुरक्षा मंडळ, अग्निशमन विभाग यांनी राष्ट्रीय ध्वजास मानवंदना दिली. यासाठी वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. गुलाब कदम यांनी समन्वय साधला. यावेळी सामुहिक भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

नाशिक औ.वि. केंद्रातील सर्व विभागांनी कोविड-१९ च्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी स्थानिक प्रशासनासोबत उचित समन्वय साधून अतुलनीय कार्य केल्याचे गौरवोद्गगार प्रभारी मुख्य अभियंता मा.श्री. पाटील यांनी प्रसंगी काढले. तसेच ते पुढे म्हणाले की, नाशिक औ.वि. केंद्राने ५० वर्षांत जीवनवाहिनी म्हणून अमूल्य कार्य केले आहे. या केंद्राने बरेच चढउतार देखील अनुभवले आहेत, तरीसुध्दा नाशिक औ.वि. केंद्र आजपर्यंत अभिमानाने अविरत वीज निर्मिती करीत आहे. यावेळी त्यांनी कोविड-१९ लसीकरणाचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी येथील रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी व वीज केंद्रातील दिव्यांग कर्मचारी यांना कोरोना योध्दा म्हणून प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. नाशिक औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता मा.श्री. एन.एम. शिंदे यांनीही याप्रसंगी शुभेच्छा संदेश पाठविला, त्याचे वाचन श्री. शशांक चव्हाण यांनी केले. सदर संदेशात श्री. शिंदे यांनी वीजनिर्मितीचे अधिकारी-कर्मचाऱ्यांनी कला, कौशल्य याचा पूरेपूर वापर करुन नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. तसेच तांत्रिक घटकांचा योग्य मेळ घालून एम.ओ.डी. च्या स्पर्धात्मक युगात प्रभावशाली कार्य करण्याबाबतचा विश्वास व्यक्त केला.

याप्रसंगी उप मुख्य अभियंता (प्रशासन) श्री. शशांक चव्हाण, उप मुख्य अभियंता श्री. एकनाथ मोझे, अधीक्षक अभियंता श्री. प्रविण गोसावी, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. आर.पी. कुमावत, श्री. आदिनाथ पोपळघट यांसह अन्य वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी, कंत्राटी कामगार व वसाहतीतील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आणि आभार प्रदर्शन कामगार कल्याण अधिकारी श्री. निवृत्ती कोंडावले व लघुलेखक श्री. अनिल कांबळे यांनी केले.

## वित्तीय पुनर्बांधणीच्या माध्यमातून महानिर्मितीच्या आर्थिक उपाययोजना सुरु

महानिर्मिती ही स्थापित क्षमतेमध्ये एन.टी.पी.सी. नंतर देशातील दुसऱ्या क्रमांकाची शासकीय वीज निर्मिती कंपनी असून महानिर्मिती संपूर्ण वीज महावितरण कंपनीला पुरवठा करते. महावितरण कंपनीला सध्या थकीत वीजबिल वसुलीपोटी महसुली समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे महानिर्मितीलाही अप्रत्यक्ष झळ सोसावी लागत आहे. परिणामत: यातून सद्य:स्थितीत मार्ग काढणेसाठी प्रामुख्याने कोळसा-इंधन खरेदीचा देखभाल-दुरुस्तीचा नित्य खर्च भागविण्यासाठी तसेच अन्य स्थिर खर्च भागविण्यासाठी महानिर्मिती काही वित्तीय उपाययोजना राबवित आहे. याचाच भाग म्हणून महानिर्मितीने कमी व्याजदरात खेळते भांडवल मिळण्याकरिता बँका व वित्तीय संस्थाना महानिर्मितीने घेतलेल्या प्रकल्प कर्ज व कॅपेक्स कर्जावरील व्याजदर कमी करण्याची विनंती केली.

याकरिता कर्ज पुनर्वित्ती म्हणजेच जास्त व्याज दराची कर्जे स्वस्त व्याजदरात रूपांतरित करण्यासाठी महानिर्मितीने मार्च २०२१ मध्ये स्वारस्य अभिव्यक्ती प्रकाशित केली होती. त्यास काही वित्त संस्थांकडून प्रतिसाद प्राप्त होऊन त्याची परिणीती म्हणजे पी.एफ.सी. तसेच आर.ई.सी. या वित्तीय संस्थांनी आपापल्या व्याजदरात कपात केली आहे. प्राप्त परिस्थितीत परिणामस्वरूप मे. रुरल इलेक्ट्रिफिकेशन कॉर्पोरेशन (आर.ई.सी.) ने चंद्रपूर प्रकल्प कर्जाचा व्याजदर १०.५०% या विद्यमान व्याजदरावरून ९% प्रतिवर्ष इतका कमी केला. यामुळे शिल्लक कर्ज कालावधीमध्ये सुमारे रु. २४३ कोटीच्या व्याज खर्चात बचत होणार आहे. याचप्रमाणे महानिर्मितीच्या विनंतीप्रमाणे मे. पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन (पी.एफ.सी.) यांनी सकारात्मक प्रतिसाद देत कोराडी (३×६६० मेगावॅट) प्रकल्पाच्या कर्जाचा विद्यमान व्याज दर १०.३७% यावरून ९% इतका करण्यास संमती दिली आहे. यामुळे या प्रकल्पाच्या शिल्लक कर्ज कालावधी मध्ये व्याजाच्या खर्चात ४७३ कोटी रुपयांची बचत होणार आहे.

याचप्रमाणे महाराष्ट्र सरकारच्या विविध वित्तीय संस्था उदा. म्हाडा, एस.आर.ए., एम.आय.डी.सी. तसेच सिडको व सिकॉम या व अन्य काही उपक्रम त्यांचा अतिरिक्त निधी इतर बंकामध्ये मुदत ठेवी मध्ये गुंतवत असतात. या शासकीय संस्थांकडून वाजवी व्याज दरामध्ये महानिर्मितीच्या प्रकल्पांना कर्ज मिळण्याकरिता प्रयत्न केले जात असून असे कर्ज उपलब्ध व्हावे याकरिता शासनाकडे विनंती करण्यात आली आहे.

